

छ.शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २६ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २६७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## सोलापूर व परिसरात दुसऱ्या दिवशीही पाऊस

**सोलापूर** : तब्बल ४५ दिवसानंतर सोलापूर शहर व जिल्ह्यात पावसाचे आगमन झाल्याने सर्वत्र आनंदी आनंद झाला आहे. काल बार्शी वगळता सर्वदूर पावसाने सर्वचजण सुखावले आहेत. कालचा पाऊस रात्री उशिरापर्यंत रिमझिम बरसत होता. आज दुपारनंतर पुन्हा पावसानचे हजेरी लावली तीही रिमझिम स्वरुपातच. हाही पाऊस सर्वांना अल्हादायक ठरला आहे. रविवारी सकाळी ८.३० वाजेपर्यंत शहर व जिल्ह्यात पडलेल्या पावसाची सरासरी नोंद ७१.२ झाली आहे. तर आज रविवारी सकाळी ८.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत पडलेल्या पावसाची नोंद ६.३ इतकी झाली आहे. हवेतील तापमानातही मोठी घट झाली असून आजचे तापमान ३०.८ इतके नोंदले गेले आहे. एकंदरच उशिरा का होईना पावसाने हजेरी लावल्याने बळीराजा सुखावला आहे तर उकाडा आणि उन्हाने हैराण झालेले सोलापूरकर सुखावले आहेत.

# मुख्यमंत्र्यांची धावपळ, प्रशासनाची पळापळ

## सोलापूरसह पंढरपूरचा धावता दौरा,यात्रेचा आढावा घेणारे पहिले 'सीएम'

सुराज्य : सोलापूर/पंढरपूर

**राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी सायंकाळी सोलापूर व पंढरपूरचा धावता दौरा केला. मुंबईहून विमानाने सोलापुरात आले. त्यानंतर विमानतळावरून मोटारीने ते पंढरपूरला रवाना झाले. पंढरपुरात आषढीवारीच्या पार्श्वभूमिवर जिल्हा प्रशासनाच्या वतीने वारकऱ्यांसाठी केलेल्या सोयी- सुविधांची त्यांनी सर्वत्र फिरून पाहणी केली तसेच शिवसेनेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या महाआरोग्य शिबिरास भेट दिली. त्यानंतर रात्री उशिरा ते मोटारीने पुण्याकडे रवाना झाले. महाराष्ट्राच्या इतिहासात मुख्यमंत्र्यांनी आषाडी यात्रेच्या तयारीचा आढावा घेणारे शिंदे हे पहिलेच मुख्यमंत्री आहेत. शिंदे यांच्या या धावत्या दौऱ्याने जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि पोलीस दलाला प्रचंड धावपळ करावी लागली.**

आषाढी एकादशीचा सोहळा गुरुवार दि.२९ जुलै रोजी होणार आहे.संतांच्या पालख्या व दिंड्या पंढरपूरच्या सीमेवर दाखल झाल्या आहेत.वैष्णवजनांची रिघ लागल्याने पंढरी भगव्या पताकांनी फुलू लागली आहे.

सर्वत्र हरिनामाचा जयघोष सुरू झाला आहे.विठुरायाचे मंदिर विद्युत रोषणाईने उजळले आहे. यंदाच्या आषढीवारीसाठी येणाऱ्या लाखों भविकांसाठी शिंदे- फडणवीस सरकारने मोठ्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून मुख्यमंत्री शिंदे यांनी पंढरपूरचा धावता करुन सर्व सुविधांची पाहणी केली.

रविवारी सायंकाळी सोलापूर विमानतळावर त्यांचे आगमन झाले. त्यांच्या समवेत ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस आयुक्त राजेंद्र माने व सहायक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे, पालिका प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख मनीष काळजे, शहराध्यक्ष मनोज शेजवाल यांनी स्वागत केले. त्यानंतर पंढरपूराला आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर पूर्वतयारीची पाहणी करण्यासाठी ते रवाना झाले.



मुख्यमंत्र्यांचे सोलापुरात विमानतळावर आगमन झाल्यानंतर मोटारीने पंढरपुरकडे जात असताना मरि आई चौकात शिवसेनेचे जिल्हा समन्यवक दिलीप कोल्हे यांनी मुख्यमंत्र्यांचे जंगी स्वागत केले. ढोल ताशाच्या निनादात फटाके फोडण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी गाडीतून उतरत स्वागत कार्यकर्त्यांचे स्वागत स्वीकारले. उपस्थित नागरिकांना अभिवादन करुन ते पंढरपूरला मार्गस्थ झाले.

### पहिलेच मुख्यमंत्री

आषाढी असेल वा कार्तिकी. या यात्रांमधील तयारीचा आढावा आतापर्यंत पालकमंत्री वा जिल्हाधिकारी घेत असत.पण यंदा पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला व पंढरीला येवून सोयी- सुविधांची प्रत्यक्ष पहाणी केली.हा दौरा अचानक ठरला.त्यामुळे जिल्हा प्रशासनातील अधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांची दमछाक झाल्याचे पहायला मिळाले.

रात्री उशिरा पर्यंत दर्शन रांग, मंदिराचा परिसर, वाळवंट, पत्रा शेड, पालखी स्थळाची शिंदे यांनी पाहणी केली.

वाखरी येथील रिंगण सोहळ्याची पाहणी करत योग्य त्या सूचना प्रशासनास केल्या. त्यानंतर वारकऱ्यांसाठी ६५ एकरावर उभारण्यात आलेल्या सुविधांची पाहणी करुन राज्याच्या आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येणाऱ्या महाआरोग्य शिबिरास भेट देऊन योग्य त्या सूचना केल्या. त्यानंतर रात्री उशिरा बाय कारने ते पुण्याकडे रवाना झाले.

### काटकसर करू नका

**पंढरपूर** : आषाढीच्या तोंडावर भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची पाहणी करण्यासाठी अचानक आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुविधा देण्यासाठी खर्चाची अजिबात काटकसर करू नका, अशा सूचना प्रशासनास दिल्या. मुख्यमंत्री शिंदे यांनी रविवारी अचानक याची पाहणी केली. यामुळे प्रशासनाची देखील मोठी धांदल उडाली. नांदेड येथील एका कार्यक्रमात शिंदे यांनी पंढरीत जाऊन कामांची पाहणी करणार असल्याचे सांगितले. त्यानुसार सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास मुख्यमंत्री शिंदे, पाणी पुरवठा मंत्री गिरीष महाजन यांनी गोपाळपूर येथील पत्राशेडमध्ये हजेरी लावली. यावेळी त्यांनी पदस्पर्श दर्शन रांगेत उभ्या असणाऱ्या भाविकांशी संवाद साधत सुविधांबाबत विचारणा केली. तसेच पत्राशेडमध्ये पंखा, मॅट आहे का याची पाहणी केली. शिंदे यांनी तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतील येथील महाआरोग्य शिबिर गोपापूर येथे भेट दिली यावेळी शिवसेनेचे सोलापूर जिल्हा शिवाजीराव सावंत सर यांनी महाआरोग्य शिबिराची माहिती शिंदे यांना दिली.

आषाढी वारी नियोजनबध्द झाली पाहिजे अशा सूचना केल्या होत्या. येणाऱ्या भाविकांना कोणतीही अडचण येता कामा नये. आषाढीस पंधरा लाख भाविक येण्याचा अंदाज असून त्या दृष्टीने लागेल तेवढा निधी, कामगार, यंत्रसामुग्री देण्याची शासनाची तयारी आहे. कामांची मुंबई येथील काही अधिकाऱ्यांनी पाहणी केली असून सुरु असलेल्या याकामाबाबत समाधानी असल्याचे शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार समाधान आवताडे उपस्थित होते.



**पालखी विसावली...** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याने वेळापुरात विसावा घेतला. त्यावेळी जमलेले भक्तगण.

## गुंगीचे औषध पाजून पुतणीवर अत्याचार

**सोलापूर** : बारावर्षीय पुतणी घरात एकटी असताना काकाने तिला मारहाण केली अन् गुंगीचे औषध पाजून तिच्यावर अत्याचार केला. पीडित मुलीने घडलेला प्रकार सांगूनही आईने लपवून ती बाब ठेवली. पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार काका आणि पीडितेच्या आईवर गुन्हा दाखल झाला आहे.

घरात गेल्यावर काकाने तिला गुंगीचे औषध पाजले. पुतणी घरात एकटी असल्याची संधी साधून काका तिच्या घरात घुसला. तिला सातत्याने मारहाण करीत त्याने तिच्यावर अत्याचार केला. ही बाब पीडितेने आपल्या आईला सांगितल्यानंतर तिने ही बाब कोणाला सांगू नको. नाहीतर आरोपी हा आपल्या दोघांना मारून टाकिल', असे सांगून ही घटना लपवून ठेवली. पीडितेच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार काका व आईवर गुन्हा दाखल झाला आहे.

## पत्नीला मित्राशी जबरदस्तीने संबंध ठेवण्यास सांगून अत्याचार

### पतीसह मित्रावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर



प्रेमाच्या जाळ्यात ओढून पीडितेशी लग्न केल्यानंतर पत्नीला मित्राशी जबरदस्तीने संबंध ठेवण्यास सांगून अत्याचार केल्याप्रकरणी पती व त्याच्या मित्रावर गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत पीडितेने विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पीडितेची आरोपीशी २०१८ मध्ये ओळख झाली.त्यानंतर आरोपीने पीडितेशी लग्न केले. लग्नानंतर पीडितेला आपल्या कर्नाटकातील घरी नेले.तेथे पीडितेला व आरोपीच्या पत्नीने व आईने विरोध केल्यानंतर आरोपीने तिला वेगळ्या ठिकाणी रूम करून ठेवले.त्यानंतर एके दिवशी आरोपीचा मित्र पीडितेच्या घरी येऊन पीडितेशी जबरदस्ती करू लागला. तेव्हा पीडितेने आरोपीला फोन केल्यानंतर 'हमारी जमात मे ये सब चलता है, वो जैसा बोल रहा है वैसा कर' म्हणत फोन कट केला.त्यानंतर आरोपीच्या मित्राने पीडितेवर जबरदस्तीने अत्याचार केला. त्यानंतर त्याने ही घटना कोणाला सांगितल्यास पीडितेला व मुलीला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. दरम्यान, पीडिता ही सोलापुरात आल्यानंतर याबाबतची फिर्याद दिली.या फिर्यादीनुसार दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

# सोलापूरच्या 'काठी'ला स्मरून सिद्धरामय्या यांनी सोडले फर्मान

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**कर्नाटक राज्यातील भाजपाची सत्ता उखडून टाकल्यानंतर सबंध देशभर काँग्रेसजनांमध्ये जबरदस्त उत्साह संचारला आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या हेच खरे सत्ताबदलाचे किमयागार. रविवारी एका निर्धार मेळाव्यात त्यांना सोलापूर शहर-जिल्हा काँग्रेस समितीच्या वतीने काठी-घोंगडे,श्री विठ्ठल रूक्मिणीची मूर्ती आणि तुळशीचा हार देण्यात आला. सोलापूरकरांकडून दिली गेलेली ही भेट पाहून सिद्धरामय्या हे अत्यंत प्रफूल्लित झाले. त्या काठीकडे पाहात त्यांनी एक प्रतिज्ञा तर केलीच शिवाय काँग्रेस कार्यकर्त्यांना एक विशेष फर्मानही सोडले. देशासह महाराष्ट्रातील भाजपची सत्ता नेस्तनाबूत करण्यास कटिबद्ध रहा, अशी हाक त्यांनी कार्यकर्त्यांना दिली.**

कर्नाटकची सत्ता आल्यानंतर सिद्धरामय्या हे पहिल्यांदाच महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले होते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीकडून सांगलीत महानिर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यासाठी सिद्धरामय्या यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यावेळी आमदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर शहर-जिल्हा काँग्रेस समितीच्या वतीने जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील व शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांनी आषाढी यात्रेचे औचित्य साधून विठुरायाचे प्रतिक असलेली काठी-घोंगडे देवून सिद्धरामय्या यांचा सन्मान करण्यात आला.

ही काठी मुठीत धरली आणि त्यानंतर त्यांनी भाषणाला सुरूवात केली. आपल्या भाषणात त्यांनी भाजपवर चौफेर टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आडवे-तिडवे घेतले.

आक्रमक शैलीत सिद्धरामय्या म्हणाले की- आम्ही भाजपला मुळासकट फेकून दिले, आता देशासह महाराष्ट्रातून उखडून टाकण्याची आमची जबाबदारी आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार देखील भ्रष्ट असून कोणत्याही परिस्थितीत या सरकारला नेस्तनाबूत करून उखडून टाका,असा आदेशही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

कर्नाटकात भाजप कधीही जनतेच्या आशीर्वाद घेऊन निवडून आले नाही, केवळ ऑपरेशन कमळ आणि आमदार खरेदी करून सत्तेवर आले. ऑपरेशन कमळ हे आमदार खरेदी विक्रीचा उद्योग आहे. कोट्यवधी खोके देऊन आमदार खरेदी करण्याचे काम भाजप करत आहे. महाराष्ट्रतील शिदे-फडणवीस सरकार देखील भ्रष्ट आहे,अशा शब्दात त्यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर हल्ला चढवला.

देशात असो किंवा राज्यातील भाजप सरकार असो त्यांचे विकासाचे धोरण नाही. फक्त एक उद्योग आहे तो म्हणजे लाच घेणे, लाच देणे आहे. प्रत्येक कुटुंबाला मोफत तांदूळ देण्याचा निर्णय आम्ही घेतला, पण केंद्रातील भाजप सरकारने फूड कॉर्पोरेशनला कर्नाटकला तांदूळ देऊ नये, अशी ताकिद दिली आहे. गरीब जनतेला मोफत तांदूळ मिळू नये, असा प्रयत्न असून तांदूळ वाटपामध्ये भाजप सरकार राजकारण करत आहे. केंद्राकडे आम्ही फुकट तांदूळ मागत नाही, तांदूळ विकत घेऊन आम्ही मोफत वाटणार आहे, पण केंद्रातील भाजप सरकार गोरगरिबांच्या विरोधातील सरकार आहे,अशी टीकाही त्यांनी केंद्र सरकारवर केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



वेळेआधी शहाणे झालेलं बरं!

## देशासह महाराष्ट्रातील भाजपची सत्ता उखडून टाका



### खोटे बोलणारे कोण?

कर्नाटक सरकारने पदवीधरांना बेरोजगार भत्ता देण्याचे काम करत आहे. देशाच्या इतिहासात खोटे बोलणारे पंतप्रधान कोण असेल, तर ते नरेंद्र मोदी आहेत. आपल्या आयुष्यात आपण असले खोटे बोलणारे पंतप्रधान पाहिले नाही. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याला कर्नाटकच्या तुबची बबलेश्वर पाणी वाटपाची योजना आहे, त्या योजनेबाबत चर्चा करून, त्या ठिकाणी पाणी देण्याचे काम करण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

## सलगर वस्ती भागात दोन गटांमध्ये हत्यारांनी हाणामारी


सुराज्य/सोलापूर

सलगर वस्ती भागात दोन गटांमध्ये तलवार, चाकू, कोयत्याने तुफान हाणामारी झाली. यात दोन्ही गटांतील २४ जणांवर सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना शुक्रवारी रात्री घडली. याबाबत दोन्ही गटांनी परस्परविरोधी फिर्याद दिली आहे. पहिल्या गटातील निखिल उर्फ गिरीश मोहन जाधव (वय २३, रा. लिमयेवाडी रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार फिर्यादी घरासमोर बसलेले असताना आरोपी हे घरासमोर येऊन विनाकारण शिवीगाळ करत दगडफेक करू लागले. यात फिर्यादीचे काका व इतर नातेवाईक जखमी झाले. या प्रकरणी विजय जाधव, विनोद उर्फ माया जाधव, दत्ता जाधव, सिध्दार्थ गायकवाड, सोमनाथ बजरंग जाधव, विनायक अशोक गायकवाड, मंजू जाधव, संदीप अंबादास जाधव व त्यांच्या ६ ते ८ साथीदारांवर गुन्हा दाखल झाला आहे.

दुसऱ्या गटातील सोमनाथ बजरंग जाधव (वय २१, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी ३) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तू आमच्याकडे का बघतोस असे म्हणत आरोपींनी बेस बॅटने, फायबर पाइपने, चाकूने मारून जखमी केले. या प्रकरणी ओम सोमनाथ जाधव, गिरीश मोहन जाधव, परशुराम जंगेकर, शिवनाथ जाधव, सामेनाळा जाधव, साईनाथ जाधव, कुमार जाधव, धीरज जाधव या सर्वांवर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पो.स.इ. सचिन मंद्रुपकर करत आहेत.

# 'वॅग्नर'चा भस्मासुर

रशिया हा आपला मित्रदेश. भारताला संरक्षण दलासाठी लागणारी यंत्रसामग्री आपण त्याच देशाकडून घेत असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्याशी संबंध सलोख्याचे ठेवले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात संबंध ठेवताना फार काळजी घ्यावी लागते. एका राष्ट्राशी मैत्री केली की, अनेक राष्ट्रांचे शत्रुत्व ओढवून घ्यावे लागते. हे पथ्य मोदींनी कसोशीने सांभाळले आहे. एकीकडे युक्रेनच्या प्रतिहल्ल्याला तोंड देत असलेल्या रशियासमोर शनिवारी एक नवे मोठे संकट उभे ठाकले. पुतीन यांनी युक्रेनमध्ये मुक्त हस्ते वापरलेल्या 'वॅग्नर ग्रुप' या भाडोत्री सैनिकांच्या लष्कराने बंडाचा झेंडा फडकविला. युक्रेन सीमेवरील मोक्याच्या ठिकाणांवर या गटाने आपले वर्चस्व प्रस्थापित केल्यामुळे रशियाची आणखी शकले पडतात की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे. रशियानेच पोसलेल्या या भस्मासुराने अखेर आपल्या निर्मात्याच्या डोक्यावर हात ठेवले. 'पीएमसी वॅग्नर' असे अधिकृत नाव असलेला हा गट स्वत: खासगी कंपनी असल्याचे सांगतो. या कथित कंपनीकडे काही हजार पगारी सैनिक आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आहेत. सोप्या शब्दांत सांगायचे तर हे एक 'भाडोत्री लष्कर' असून 'सुपारी' देणाऱ्या कुणालाही ते सेवा देते. चेचेन्याच्या युद्धात लष्करी तुकडीचे नेतृत्व केलेले ज्येष्ठ रशियन लष्करी अधिकारी दिमित्री व्हॅलेरिएविच उतकिन हे या कंपनीचे संस्थापक असल्याचे मानले जाते. वॅग्नर ग्रुप हा नाझीवादी, श्वेतवर्णवादी आणि अतिउजव्या अतिरेकी विचारसरणीचा आहे.



स्वतः उतकिन इतके कडवे हिटलरवादी आहेत की, त्यांच्या मानेखाली दोन्ही बाजूला नाझी पक्षाची चिन्हे गोंदविलेली आहेत. वॅग्नर या नावाचे मूळ काय हे कुणालाच माहीत नसले तरी एका गृहीतकानुसार, हिटलरचा आवडता संगीतकार रिचर्ड वॅग्नर याच्यावरून हे नाव ठेवले असावे. रशियातील अब्जाधीश येवगेनी प्रिगोझिन यांचे मोठे आर्थिक पाठबळ या कंपनीला मिळाले असून सध्या तेच वॅग्नरचे प्रमुख आहेत. २०१४ साली युक्रेनमधून क्रिमियाचा लचका तोडताना पुतीन यांनी सर्वप्रथम या भाडोत्री सैनिकांचा वापर केला. नंतर युक्रेनच्या डोनबास प्रदेशातील फुटीरतावादी गटांना ही संघटना लष्करी आणि वेळप्रसंगी आर्थिक मदत करत होती. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर काही भागांमध्ये याच वॅग्नर गटाचे सैनिक लढा देत आहेत. बाख्मुत शहर याच कंपनीने ताब्यात घेतले आहे. ज्या गोष्टी रशियाचे लष्कर उघड करू शकत नाही, अशा कारवाया पुतीन हे वॅग्नर ग्रुपकरवी करून घेत असल्याचे बोलले जाते. युद्धकैद्यांचा छळ करणे, अतिरेकी गटांना मदत करणे आदी कामे वॅग्नरचे भाडोत्री सैनिक बिनबोभाट करत असतात. युक्रेनमध्ये प्रत्यक्ष लष्कर घुसविण्यापूर्वी पुतीन यांनी या गटाकरवी स्वत:च्याच भागात खोटे हल्ले घडवून (फॉल्स फ्लॅग ऑपरेशन) युद्धाला कारण निर्माण केल्याचे सांगितले जाते. २०१५ साली सीरियामध्ये सरकारच्या बाजूने वॅग्नरचे भाडोत्री सैनिक लढले. यावेळी त्या देशातील तेलाच्या विहिरींचे संरक्षण करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारीही याच गटाने पार पाडली होती. लीबियामध्ये जनरल खलिफा हफ्तार यांनी वॅग्नरच्या सैनिकांना आपल्या बाजूने रणांगणात उतरविले होते. मध्य आफ्रिकेतील हिऱ्याच्या खाणी आणि सुदानमधील सोन्याच्या खाणींच्या संरक्षणाचे काम तेथील सरकारांनी याच कंपनीला दिल्याचे सांगितले जाते. माली या पश्चिम आफ्रिकेतील देशामध्ये तेथील सरकारने इस्लामी दहशतवाद्यांविरोधात लढण्यासाठी वॅग्नर गटाची मदत घेतली होती आणि त्यावेळी त्यांनी केलेल्या कामगिरीची माली सरकारने प्रशंसाही केली होती. या कारवायांमधून प्रिगोझिन यांनी अमाप पैसा कमाविल्याचीही वदंता आहे. प्रिगोझिन यांनी आतापर्यंत पुतीन यांच्याविरोधात एकही शब्द उच्चारलेला नसला तरी त्यांच्या सैन्याने रशियाची राजधानी मॉस्कोकडे कूच केली आहे. पुतीन हे तसे हुकूमशहाच. पाकने दहशतवादाला आश्रय दिला. काय अवस्था झाली, त्या देशाची. प्रतिगामी व्यवस्था सत्ताधीशांच्या अंगलट येते हा संदेश पुतीन यांच्या कारभारातून जगभर गेला आहे.


जयंती विशेष

# लोककल्याणकारी व प्रजाहितदक्ष राजा

शिक्षणाशिवाय समाज प्रगत होऊ शकत नाही, त्यामुळे शिक्षण हे सर्व तळागाळात पोहोचले पाहिजे, समाजातील प्रत्येकाला शिक्षण मिळाले तर समाज प्रगती केल्याशिवाय राहणार नाही अशी धारणा असणारे, ज्यांनी आपल्या कारकिर्दीत शेती, जलसिंचन, बांधकाम, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, व्यवसाय यासह इतर क्षेत्रात केलेली दूरदृष्टी कामगिरी आजही चकित करणारी असून त्यांनी केलेले कार्य त्यांच्या दूरदृष्टीचे आज साक्ष देतात. अज्ञान, अंधकार, अंधश्रद्धेत चाचपडत पडलेल्या समाजाला प्रकाशकडे नेण्याचे जनकल्याणकारी कार्य करणारे, शिक्षणाच्या कोसोदूर असलेल्या समाजाला शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे कार्य करणारे, माणसाला माणूस म्हणून जगणं शक्य व्हावं, म्हणून कार्य करून कोणताही उच्च-नीच, लहान-मोठा कसलाच भेदभाव न ठेवता सर्व प्रजाजनांना सोबत घेत लोककल्याणकारी कारभार करणारे, ज्यांनी महापुरुषांचा घेतलेला विचार आयुष्यभर जपला, ज्यांनी समाज, शिक्षण, उद्योग, नोकरी, क्रीडा, राजकिय, सामाजिक, यासह अशा अनेक सर्व क्षेत्रात पुढे जाण्यासाठी समाजातील सर्व घटकांना प्रोत्साहन देणारे. सामाजिक बंधुभाव, समता, समाज उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य यासह इतर सर्वच क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणणारे. सर्वांना शिक्षण, रोजगार, नोकरी व सर्वांच्या बरोबरीचे हक्क मिळवून देणारे महान राजे म्हणजे, राजर्षी शाहू महाराज होय. आज त्यांची जयंती त्यानिमित्त हा लेखप्रपंच...

अशा या महान लोककल्याणकारी राजाचा जन्म २६ जून १८७४ रोजी कोल्हापूर येथील राजवाड्यात विश्राम भवन येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब तर आईचे नाव राधाबाई घाडगे ते कागलचे जहागीर होते. महाराजांचे नाव यशवंत होते ते दहा वर्षाचे असताना कोल्हापूरचे वारसदार म्हणून दत्तक विधान झाले व ते कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहू महाराज झाले, त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. प्रत्यक्षात २ एप्रिल १८९४ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी वयाच्या विसाव्या वर्षी कोल्हापूर संस्थानाचे अधिकार सूत्रे घेऊन लोककल्याणकारी कार्याची सुरुवात केली.

राजर्षी शाहू महाराजांनी लोककल्याणाचा पहिला जाहीरनामा काढून आपल्या जनकल्याणकारी कार्याची सुरुवात केली, आमचे प्रजाजन सदा, सुखी व संतुष्ट राहावे, त्यांच्या हितसंबंधांची सतत अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानच्या सर्व बाजूंनी उत्कर्ष व्हावा अशी आमची इच्छा आहे, हा उद्देश सफल होण्यासाठी आमचे सरदार, जहागीरदार, मानकरी, इनामदार, कामगार, आप्तजन सर्व दर्जाचे शेठ-सावकार आणि इतर प्रजाजन यांच्या उज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे, आज आमच्या राज्यकारभारास सुरुवात होणाऱ्या दिवशी आमचा राज्यकारभार दीर्घ काळापर्यंत टिकून तो प्रजेसाठी सुखद व्हावा म्हणून आम्ही त्या परात्पर जग चालकाच्या अनुग्रहासाठी प्रार्थना करतो. यावरून यांच्या कार्याचा दृष्टिकोन कळतो.



राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक बंधुभाव, समता, समाज उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य यासह इतर सर्वच क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणला. सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी त्यांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली. अशा या महान प्रजाहितदक्ष राजा शाहू महाराजांच्या कार्याला माझे कोटी कोटी प्रणाम...!

छत्रपती शाहू महाराजांच्या मनात सामान्य जनतेबद्दल एक तळमळ होती. त्यांची स्थिती सुधारावी हे त्यांचे प्राथमिक ध्येय होते, ते पूर्ण व्हावा, म्हणून साक्षरता महत्त्वाची त्यांनी शैक्षणिक क्रांती घडवली राजर्षी शाहू महाराजांनी संपूर्ण कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. शिक्षण हे एक क्रांतीची साधन असून प्राथमिक शिक्षणावर भर देत सक्तीचे आणि मोफत करण्याचा कायदा केला. शिक्षण सक्तीचे व मोफत करणारे, भारतातील पहिले संस्थान कोल्हापूर हे होती. प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक उच्च व तंत्रशिक्षणालाही महाराजांनी महत्त्व दिले. बहुजन समाजाला शिक्षण देण्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही ही बाब महाराजांनी ओळखून या शैक्षणिक क्रांतीची सुरुवात करून बहुजन समाजाला शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले. त्यांनी गरीब, होतकरू, तरुणांना अनेक प्रकारची मदत करत विद्यार्थ्यांना वसतिगृहे, शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, तसेच परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली, सर्व विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुरुवात करून सर्वांनी समानतेने वागावे यासाठी महाराज सदैव प्रयत्नशील राहिले. शाळा, दवाखाने, पाणवठे, विहिरी, सार्वजनिक इमारती सर्वांसाठी खुल्या केल्या. शिक्षणामुळे समाजाचा विकास होतो ही बाब लक्षात घेत राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक क्रांती घडवून आणली.

राजर्षी शाहू महाराजांनी समाजकल्याणासाठी विविध योजना आखून त्यांची काटेकोर अंमलबजावणी केली. लोकांसाठी रोजगार, रोजंदारीची कामे, पिण्याच्या पाण्याची सोय, तळे, रस्ते, धरणे आदी कामे करून सामान्य जनतेचे जीवन सुखकर केले. अपंग, विकलांग, अनाथ, गरीब, निराधार, वृद्ध यांच्यासाठी वसतिगृहे, बोर्डिंग हाऊसची उभारणी केली. राजर्षी शाहू महाराजांनी नव्या युगाची सुरुवात केली, त्यांनी सामाजिक सुधारणात्मक कार्य केले. राजांना सर्व प्रजाबद्दल अतिशय प्रेम होते, त्यांनी माणसाला माणूस बनवले. त्यांनी सामान्याला मुख्य प्रवाहात आणून शिक्षण, रोजगार, नोकरी आणि सर्वांच्या बरोबरीने हक्क मिळवून देऊन, स्त्रीयांनाही समानतेचा दर्जा दिला. जनकल्याणकारी कायदे करून सामान्याचे जीवनात नवचैतन्य निर्माण केले. 'रयतेचे कल्याण'हेच त्यांचे अंतिम ध्येय होते. आयुष्यभर त्यांनी बहुजनांच्या कल्याणासाठी परिश्रम घेतले. दिन-दुबळ्या लोकांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे कार्य केले. महाराष्ट्राच्या पुरोगामीत्वाची प्रतिभा त्याच्या प्रतिभा त्यांच्या थोर कार्यामुळे उभी राहिली बहुजन समाजाची व विशेषत: सामान्य वर्गाची अस्मिता जागृत करण्याचे त्यांच्या सर्वांगीण उद्धाराचे कार्य त्यांनी केले, त्याद्वारे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात समता प्रस्थापित करण्याचे मौलिक कार्य केले. महाराजांनी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिकतेचा, जाणतेपणाने विचार करून सामान्य लोकांच्या प्रगतीसाठी त्यांच्या हितासाठी कृतिशील कार्य केले. काळाच्या पुढे पाहण्याची दृष्टी लाभलेल्या लोकराजाने सामान्याच्या मनामध्ये नवचैतन्य आणण्याचे कार्य केले.

**- राहुल मोरे.**

टुडेज् ब्लॉग

# पालकांची भूमिका

**आज २६ जून. जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन.** अंमली पदार्थांची वाढती तस्करी आणि ड्रगजच्या आहारी जात असलेली तरुण पिढी हे संपूर्ण मानवजातीसाठी चिंतेचा विषय बनला आहे. अंमली पदार्थांच्या तस्करीच्या बातम्या रोज वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्यांवर पाहायला व वाचायला मिळतात. अंमली पदार्थांचा हा व्यापार झपाट्याने वाढत असून त्यात तरुण पिढी बरबाद होत आहे. नशा हे नाशाचे दुसरे नाव आहे, जे माणसाच्या मेंदूला नियंत्रित करून त्याला संपूर्णतः उद्ध्वस्त करते. आजकाल गुन्हेगारी झपाट्याने वाढली असून अंमली पदार्थांचा अवैध व्यवसायही शिगेला पोहोचला आहे.

अंमली पदार्थांचे सेवन आणि अवैध तस्करी विरुद्ध आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी २६ जून रोजी जगभरात जनजागृती करण्यासाठी पाळला जातो आणि अंमली पदार्थांपासून मुक्त जग साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या कृती आणि सहकार्याला बळकटी दिली जाते. अंमली पदार्थांचा वापर करणाऱ्या अनेक व्यसनींना कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो आणि परिणामी त्यांना योग्य उपचार, आधार मिळत नाही. यावर्षी २०२३ ची थीम आहे लोक प्रथम: कलंक आणि भेदभाव थांबवा, प्रतिबंध मजबूत करा. यावर्षीच्या मोहिमेचा उद्देश अंमली पदार्थांचे व्यसन असलेल्या लोकांशी आदर आणि सहानुभूतीने वागण्याच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करणे आहे; जेणे करून त्या व्यसनींना आपल्या सर्वांच्या सहकार्याने नशामुक्त होऊन पुन्हा सन्मानाने जगण्याची संधी मिळेल.

नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राइट्सने केलेल्या अभ्यासानुसार, देशातील किशोरवयीन मुलांमध्ये तंबाखू आणि दारू ही सर्वात सामान्य व्यसनं आहेत, मग इनहेलेंट्स आणि भांग आहेत. तंबाखूचा वापर सुरू केलेले सरासरी वय १२ वर्षे दर्शविले, आणखी एका अभ्यासात असे आढळून आले आहे की ४६ % झोपडपट्टीत राहणाऱ्या किशोरवयीन मुलांनी अगदी लहान वयात धूम्रपान आणि तंबाखू तसेच दारू आणि गांजा यांचा वापर सुरू केला होता. शहरांतील अनेक झोपडपट्ट्यांमध्ये किंवा अनेक ग्रामीण भागात अगदी ६-७ वर्षे वयोगटातील मुलेही ज्वलनशील रसायने व अंमली पदार्थांचा उग्र वास घेताना किंवा तंबाखू खाताना दिसतात. २०२२ मध्ये २६,६२९ किशोरवयीन मुलांनी अंमली पदार्थ सेवन केल्याची नोंद झाली आहे, जी २०१६ च्या तुलनेत ३००% वाढ दर्शवते. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने केलेल्या राष्ट्रीय व्यापक सर्वेक्षणानुसार, देशात ६ कोटींहून अधिक ड्रग्ज वापरणारे आहेत. ज्यामध्ये मोठ्या संख्येने वापरकर्ते १०-१७ वयोगटातील आहेत.




ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या नॅशनल ड्रग डिपेंडन्स ट्रीटमेंट सेंटरने शालेय विद्यार्थ्यांमधील अंमली पदार्थांच्या गैरवापरावर केलेल्या अभ्यासादरम्यान असे आढळून आले की, सर्वेक्षण केलेल्या १४ पैकी १ विद्यार्थ्यांनी गेल्या महिन्यात कोणत्यातरी अंमली पदार्थ वापरले होते. हे सर्वेक्षण मे २०१९-जून 2020 दरम्यान इयत्ता ८-१२ च्या सुमारे ६००० शालेय विद्यार्थ्यांवर करण्यात आले. सर्वेक्षणात असे आढळून आले की १०% पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी मादक द्रव्यांचे सेवन (इनहेलेंट्स, कॅनॅबिस, ओपिओइड्सपासून ते अल्कोहोल आणि तंबाखूपर्यंत) केले होते. वर्षनिहाय विश्लेषणात असे दिसून आले की ४% तंबाखू वापरतात, त्यानंतर अल्कोहोल ३.८%, ओपिओइड्स २.८% (अफु, हेरॉइन आणि फार्मास्युटिकल ओपिओइड्स), कैनबिस (भांग, चरस आणि गांजा) २% आणि १.९% टक्के विद्यार्थ्यांनी इनहेलेंट्स चा नशा केला. इंडियन जर्नल ऑफ सायकियाट्रीने मेटा-विश्लेषणात म्हटले आहे की, शालेय विद्यार्थ्यांमध्ये मादक पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण १८% इतके जास्त आहे. गेल्या आठ वर्षांत भारतात अंमली पदार्थांचा वापर ७० टक्क्यांनी वाढला असून, देशात सुमारे १०० दशलक्ष व्यसनी आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या म्हणण्यानुसार, भारतातील १३ टक्के ड्रग्ज व्यसनी हे २० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत.

देशाच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने शेवटच्या अहवालात अंमली पदार्थांच्या अंदाजे वापराची आकडेवारी जाहीर केली आहे, त्यात असे दिसून आले की, ३१ दशलक्ष गांजाचे वापरकर्ते होते, २४ दशलक्ष ओपिओइड वापरकर्ते आणि ७.७ दशलक्ष इनहेलर वापरत होते. २०४७ पर्यंत भारताला 'अंमली पदार्थ मुक्त' करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

**- डॉ. प्रितम गेडाम, नागपूर.**

जन्म हा अखेरचा

## प्राणानुग्रहस्थल - ३



कुत्रा वेषांतर केलेल्या मालकाला ओळखतो; परंतु स्वत:ला बुद्धीमान समजणारा माणूस मात्र आपल्या मालकाला ओळखू शकत नाही. त्याला मान्य असलेल्या रुपात आणि वेषात जर परमेश्वर आला तरच तो परमेश्वराला ओळखतो. ईश्वराला वस्तुत: कोणताही आकार नसतो.

शिव मायातीत आहे, तो सद्रुप, चिद्रुप आणि आनंदरुप आहे. तो अद्वय आहे, म्हणजे त्याच्याशिवाय दुसरे तत्त्व अस्तित्त्वात नाही. तो एकमेव आहे. अशा लक्षणांनी युक्त शिवामध्ये शिवयोग्याचे प्राण विलीन होतात. तेव्हा तो निश्चल होऊन राहतो. तो समाधीत मग्न होतो. शेवटी या स्थलाचा समारोप करतात. प्रध्वस्तवासनासंगात् प्राणवृत्तिपरिक्षयात् । शिवैकीभूतसर्वात्मा स्थाणुवद्भाति संयमी ।। (१७.३३)

जो योगाभ्यास करतो, त्याच्या मनातील सांसारिक वासना हळूहळू क्षीण बनत जातात. सांसारिक वासना मनुष्याला कधी पूर्ण तृप्त करु शकत नाही. त्या त्याला सदैव अतृप्त ठेवतात. कितीही खाल्ले तरी पोट भरत नाही. त्याप्रमाणे कितीही खाल्ले तरीही मन भरत नाही. खाण्याची इच्छा तशीच असते. पोटात जागा नाही म्हणून कोणी अधिक खात नाही इतकेच. वासनेत तृप्त करण्याचे सामर्थ्यच नाही तर ती तृप्त कशी करील? ही सामान्य माणसाची कथा आहे. शिवयोग्याच्या वासना मात्र नष्ट होतात. त्याने प्राणाला कुंभक करुन शिवात विलीन केलेले असल्यामुळे प्राण्याच्या पूरक व रेचक या वृत्तींचा क्षय झालेला असतो. पाण्यात पाणी एकरुप व्हावे त्याप्रमाणे तो शिवाशी समरस होतो, तो सर्वात्मा होतो. सर्वांच्या आत्म्यातून तोच प्रकाशित होत असतो, असा शिवयोगी वठलेल्या झाडाच्या बुंध्याप्रमाणे निश्चल होतो.

शिवयोगी शिवाशी तादात्म्य झाल्यामुळे तो शिवासारखा होतो. अशाप्रकारे प्राणानुग्रहस्थलात प्राणाच्या पूरक-रेचक वृत्तींना रोधून शिवात प्राण विलीन केला जातो. प्राण स्थिर होतो आणि त्याबरोबर मनदेखील स्थिर होतो. प्राणाचा असा अनुग्रह झाला की निश्चल स्थिती प्राप्त होते.

**कायार्पितस्थल**

लिंग-षट्स्थलातील प्रसादीस्थलाचे यापुढील उपस्थल आहे कायार्पितस्थल. काया म्हणजे शरीर. आपले शरीर इष्टदेवतेला अर्पण करणे म्हणजेच कायार्पितस्थल.

**शिवस्य पररुपस्य सर्वानुग्राहिणोऽर्चने । त्यागो देहाभिमानस्य कार्यार्पितमुदाहृतम् ।। (श्रीसिद्धांतशिखामणी, १७.३४)**

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**


जनमानस

## आरक्षणाचे जनक : राजर्षी शाहू महाराज

छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाडगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले व त्यांचे नाव 'शाहू' असे ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला. शिक्षण चालू असतानाच १ एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या मुलीशी शाहू विवाहबद्ध झाले. त्यावेळी त्यांचे वय १७ वर्षाचे होते. लक्ष्मीबाईचे वय बारा वर्षांहूनही कमी होते. सन २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यरोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर सन १९२२ सालापर्यंत म्हणजे २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. त्या कालखंडात शाहू महाराजांनी बहुजन समाजातील मुला मुलींच्या शिक्षणासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी १९१९ सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगवेगळ्या शाळा बंद केल्या जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. १९१७ पुनर्विवाहाचा कायदा करून विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांची अभ्यासू व कोणतीही गोष्ट शिकण्याची वृत्ती असल्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व विकसित झाले. १८९६ च्या दुष्काळी व प्लेगच्या साथीच्या काळात त्यांनी मोलाचे कार्य केले. याच कालखंडात दुष्काळी कामे तगाई वाटप स्वस्त धान्य दुकाने निराधार आश्रमाची स्थापना करून लोकांची सेवा केली. तेव्हा प्रजेला असे वाटते की असा राजा होणे नाही. शेतकऱ्यांसाठी कमी व्याजदरात कर्जपुरवठा करून राधानगरी धरणाच्या माध्यमातून कोल्हापूरच्या पंचक्रोशी हरितक्रांती केली आणि लोकांचे लक्ष कृषी विकासाकडे वेधले गेले. आबालाल रहमान यांच्यासारख्या कलावंतांना राजश्री देऊन त्यांना प्रोत्साहन दिले शाहू महाराजांना राजाची ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात संगीत चित्रपट चित्रकला व लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना राजेश्री देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याची कार्य केले अशा थोर मानवाचा ६ मे इसवी सन १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले



**- प्रा. दादाराव डांगे.**



## - संतविचार -

**डॉ. देविदास गुरव, सोलापूर**

# 'तो हा विठ्ठल बरवा'

**'रूप पाहता लोचनी । सुख जाले वो साजनी ।।**
**तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ।।**
**बहुत सुकृताची जोडी । म्हणुनि विठ्ठली आवडी ।।**
**सर्व सुखाचे आगर । बाप रखुमादेविवरू' ।।**

पंढरीचा राणा, पंढरीचा राजा हा विठ्ठल समस्त विश्वाचे दैवत. सर्वांनाच त्याचे वेड लागले आहे. संतांना, भक्तांना, वैष्णवांना विठ्ठलाच्या सुंदर, देखण्या रूपाचे वेड लागले आहे. 'राजस सुकुमार मदनाचा हा पुतळा' सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. सर्व सुखाचा दाता असलेल्या पंढरीरायाच्या अक्षर रूपाचे कौतुक संत ज्ञानेश्वरांनी मोठ्या भक्तिभावाने गायिले तर आहेच. साक्षात परमप्रिय भगवंताचे जे स्वरूप अनुभवात उतरले ते त्यांनी कथन केले आहे. माऊलीच्या या अभंगात अंतरंगातील विठ्ठलभक्ती ओसंडून वाहते आहे. पंढरीनाथाचे दर्शन स्वर्गीय सुख देणारे आहे. विठ्ठलाचे सगुण साकार रुप माऊलीच्या मनाला खूपच भावले आहे. त्यामुळे मनातील विलक्षण आनंद लहरी शब्दातून प्रतिबिंबित झाले आहे. 'हा विठ्ठल, हा माधव म्हणजे लावण्याची खाण आहे', परब्रह्मरुपी पांडुरंगाचे दर्शन म्हणजे शाश्वत सुखाची अनुभूती होय. माऊली विठ्ठलास प्रेमळ साद घालत आहेत. विठ्ठल प्राप्तीसाठी पूर्व पुण्याईबरोबरच तितकीच उत्कट भक्तिसुद्धा लागते. जणू हे ते सुचवित आहेत. श्रीविठ्ठलाचे सगुण दर्शन होताच पापण्या आपोआपच मिटतात. मन, बुद्धी आणि दृष्टीच्या पलिकडे चैतन्यमयी निर्गुण रूप अनुभवतो, तेव्हा त्या सुखाची, सामान्य सुखाशी तुलनाच करता येत नाही.


ज्ञानोबारायाचे अंत:चक्षूने घेतलेले विठ्ठदर्शन नि त्यामुळे अंत:करणात उसळलेला आनंदसागर हळूवार शब्दात उतरवतात. प्रपंचातील सुख क्षणिक असते. परंतु जो सर्व सुखाचा सागर आहे, अशा विठू माऊलीला पाहताच जीवनाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते. संत ज्ञानदेवांच्या अमृत वाणीतून साक्षात विठ्ठलच उभा ठाकल्याचे जाणवते. त्यांच्या वाणीतील ते सुख मनात चिरंतन रहाते. संत नामदेवांचीही विठ्ठलभक्ती तितकीच दृढ व मधुर आहे. कीर्तनातून भक्तीची ही नादमयता अनुभवताना अंतरंगात ईश्वर प्रेमाची अनोखी भावना निर्माण होते.

**'विठ्ठल आमुचे सुखाचे जीवन ।**
**विठ्ठल स्मरण प्रेमपान्हा**
**विठ्ठलचि घ्यावो विठ्ठलचि गावो ।**
**विठ्ठलचि पाहो सर्वांभूती' ।।**

माऊलीप्रमाणेच नामदेवरायांचा भक्तिभाव अनेक अभंगात आविष्कृत झाला असून, विठ्ठलाचेच ध्यान, गायन, मनन, चिंतन करता करता सर्वत्र तोच व्यापून राहिला आहे ही प्रचिती त्यांना येते. तेव्हा चित्त परमसुखाने भरून जाते असे वाटते. नाथांचा अनुभव तर भक्तीच्या एक वेगळ्याच भावविश्वात घेऊन जातो. विठ्ठलाबरोबर पंढरीचे वैशिष्ट्यपूर्ण नातेही हळूवार व उत्कट जिव्हाळ्याने वर्णितात.

**'माझे माहेर पंढरी । आहे भीवरेचे तीरी ।।**
**बाप आणि आई । माझी विठ्ठल रखुमाई ।।**
**पुंडलिक बंधु आहे । त्याची ख्याती सांगू काय ।।**
**माझी बहीण चंद्रभागा । करीतसे पाप भंगा ।।**
**एका जनार्दन शरण । करी माहेरीची आठवण ।।**

गळ्यात तुळशी हार, पीतांबर, कानी मकर-कुंडल, गळ्यात कौस्तुभ मणी नि कर कटावर ठेवून विटेवर उभा असलेल्या विठ्ठलाच्या देखण्या रूपाचे दर्शन हे विलक्षण सुखदायक आहे. असा हा पंढरीनाथ चंद्रभागेतीरी उभा आहे. ती पंढरी नगरी जणू भूतलावरील वैकुंठ आहे. सकळ संतांचे ते माहेरघर आहे. पंढरी आणि पंढरीनाथाचे वर्णन सर्वच संतांनी अतिशय आवडीने गायिला आहे. विशेषत: ज्या नगरीत पांडुरंग गेल्या अठ्ठावीस युगांपासून उभा आहे, त्या पंढरपुराचे गुणगान गाताना त्यांची वाणी बहरून येते. ते आपल्या हक्काचे माहेर आहे. बाप नि आई, सखा, बंधू, बहीण सारं काही पंढरीत गवसते. नाथासह सर्वच संतांना, भक्तांना भीवरेच्या तीरी वसलेले पंढरपूर अतिशय प्रिय वाटते. माहेराच्या नात्यातला प्रेम-जिव्हाळा, भावनिकतेचे वैशिष्ट्यपूर्ण नाते पंढरीने जपले आहे, जोडले आहे. अंतःकरणातील प्रगाढ विश्वासाने त्यांनी पंढरीचा महिमा वर्णिला आहे. सर्वच संतांना पंढरीविषयी विशेष आस्था आहे. कारण ही पंढरी साधीसुधी नाही तर नाथ माऊली म्हणतात, 'त्याप्रमाणे, **'बहुत काळाचे हे क्षेत्र । सकळ देवांचे माहेर ।। सकळ संतांचे निज मंदिर ।** पांडुरंगाची नगरी बहुत पुरातन आहे. समस्त देव-देवतांचा, संताचा निरंतर मेळा या ठिकाणी भरलेला असतो. कारण सगळ्यांना विठ्ठलाचा स्नेहात न्हाऊन भक्ती कल्लोळात नाचावयाचे असते. दुजाभाव विसरून कीर्तनाच्या गजरात व विठ्ठलाच्या गजरात सारे दंग होतात. ही सारी अलौकिक अनुभूती फक्त पंढरीतच मिळते. म्हणून तुकोबा म्हणतात,



**'पंढरीचा महिमा ।**
**देता आणिक उपमा ।।**
**ऐसा ठाव नाही कोठे ।**
**देव उभाउभी भेटे ।।**
**आहेत सकळ ।**
**तीर्थे काळे देता फळ ।।**
**तुका म्हणे पेठ ।**
**भूमिवरी हे वैकुंठ ।।**

पंढरीच्या श्रेष्ठत्वाला दुसरी उपमा देताच येत नाही. त्रैलोक्यात पंढरी सर्वश्रेष्ठ आहे. येथे देव सर्वांना भेटतो.

पंढरपूर म्हणजे भक्तीपीठ, पंढरपूर म्हणजे सर्व तीर्थाचे स्थान. मान-अपमान, प्रतिष्ठा, 'मी-तू'ची भावना, मनातले सारे विकार पंढरीत नाहीसे होतात. संत आणि त्यांची वाणी पंढरी व पंढीरानाथाला समर्पित आहे. आज जरी देहाने पंढरीस जाता येत नसले तरी. संतांच्या अभंगवाणीतून मात्र, भूवैकुंठ पंढरपुराचे व भक्तवत्सल विठू माऊलीचे दर्शन नक्कीच घडवते.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## विजांच्या कडकडाटामुळे घाबरुन बैलजोडी पडली विहीरीत

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील बणजगोळ परिसरात काल रात्री वादळीवाऱ्यासह विजांचा कडकडाट सुरु होता.या विजांच्या कडकडाट मुळे घाबरुन राजशेखर श्रीमंत मुळे यांच्या शेतात बांधलेली दोन बैल घाबरुन विहीरत उड्या टाकल्याने जागीच दोन्ही बैलांचा मृत्यू झाला.खरीप हंगामाच्या तोंडावर राजशेखर श्रींमत मुळे यांच्या कुटुंबीयांवर मोठा आर्थिक संकट कोसळला आहे.एका महिन्या पूर्वीच राजशेखर मुळे यांनी १ लाख ६० हजार रुपये देऊन बैल जोडी खरेदी केली होती. काल बणजगोळ येथे रात्री १०.३० वाजता बारीक पाऊस सुरु होता.याच वेळी आकाशात विजांचा कडकडाट सुरु होता. विहीरी जवळच बैल गोठा असल्याने बैल घाबरुन खुंटीसह तोडून विहीरत पडल्याने दोन्ही बैलांचा जागीच मृत्यू झाला आहे.

## मुंढेवाडीत पाऊणे नऊ लाखांची दारु जप्त

**अक्कलकोट** : राज्य उत्पादन शुल्क विभागाने शनिवारी मुंढेवाडी (ता. अक्कलकोट) येथे शेतात बनविलेल्या एका पत्र्याच्या शेडमधून गोवा राज्य निर्मित व विक्रीस असलेला ८.%९ लाख किंमतीचा विदेशी दारुचा साठा जप्त केला आहे. मुंढेवाडी (ता. अक्कलकोट) गावाच्या हद्दीत मुंढेवाडी-केगाव रोडवरील शिरगुरे वस्ती याठिकाणी एका शेतात बनविलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकला असता त्या ठिकाणाहून गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंध असलेला विदेशी मद्याच्या १२४ पेट्या जप्त करण्यात आल्या. घटनास्थळी कोणीही इसम मिळून न आल्याने गुन्ह्यातील संशयित फरार आरोपींचा शोध घेण्याच्या दृष्टीने पुढील तपास दुय्यम निरिक्षक शिवकुमार कांबळे करीत आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार संचालक (अंमलबजावणी व दक्षता) सुनिल चव्हाण, पुणे विभागाचे विभागीय उपआयुक्त मोहन वर्दे, अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली निरिक्षक सुनिल कदम, दुय्यम निरिक्षक सुरेश झगडे, शिवकुमार कांबळे, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, जवान अशोक माळी, अण्णा कर्चे, योगीराज तोग्गी यांच्या पथकाने पार पाडली.

## दुचाकी घसरली ; जखमीचा मृत्यू

**सोलापूर** : वेगाने जाणारी दुचाकी घसरल्याने चालक गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाले . हा अपघात हैदराबाद महामार्गावरील बोरामणी जवळ शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडला . चंद्रशेखर गणपतराव वनकुद्रे (वय ५७ रा. सग्गमनगर, विडी घरकुल ) असे मयत झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे . ते शुक्रवारी दुपारी बोरामणी ते सोलापूर असा प्रवास करीत होते . यशराज हॉटेल समोर दुचाकी घसाल्याने ते गंभीर जखमी झाले होते . त्यांना श्रीकांत (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते रविवारी पहाटेच्या सुमारास मयत झाले . या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## गळफास घेतलेल्या इसमाचा मृत्यू

**सोलापूर** : दारूच्या नशेत गळफास घेतलेला एजाज खाजासाहेब मणियार (वय ४५ रा.लोहारा जि.धाराशिव) हा सोलापुरातील शासकिय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी दुपारी मरण पावला . त्याने २० जून रोजी रात्रीच्या सुमारास लोहारा येथील राहत्या घरात दारूच्या नशेत गळफास घेतला होता . त्याला फासातून सोडवून लोहारा येथे प्राथमिक उपचार केल्यानंतर सोलापुरातील शासकिय रुग्णालयात सकलेन शेख (मेहुणा ) यांनी दाखल केले होते . अशी नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे .

## गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : शहरातील बुधवार पेठ परिसरात राहणाऱ्या अशोक पांडुरंग सुरवसे (वय ६०) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्याचा प्रयत्न केला . ही घटना शनिवारी सकाळच्या सुमारास घडली . त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले . पैशाच्या व्यवहारातून त्याने घरातील छताच्या लाकडी वाशाला साडीने गळफास घेतला होता . त्याला फासातून सोडवून शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले . या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे .

## वारीला चढला रंग, वारकरी भारूडात दंग



वेळापुरात विसाव्याच्या ठिकाणी वारकरी भारूडात दंग असल्याचे पाहायला मिळाले.

## आज व्यापारी संमेलन

**अक्कलकोट** : मोदी सरकारच्या ९ वर्षातील कामगिरीची माहिती सर्व व्यापारी बांधवांपर्यंत पोहचविण्यासाठी सोमवारी दि,२६ जून रोजी दुपारी ठीक ५ वाजता बसवेश्वर मार्केट यार्ड अक्कलकोट येथे व्यापारी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या अभियानाला माजी सहकार मंत्री आमदार सुभाष देशमुख, भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी आणि जिल्ह्याचे खासदार ष.ब्र. डॉ जयसिद्धेश्वर महास्वामीजी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

तरी सर्व व्यापारी बांधवांनी या संमेलनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपचे तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड व शहराध्यक्ष शिवशरण जोजन आणी व्यापारी असोसिएशनचे वतीने करण्यात आली आहे.



## रूपाली चाकणकर यांची नातेपुते येथील राष्ट्रवादी पक्ष कार्यालयास भेट

**सुराज्य/नातेपुते**

कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, मालमत्तेच्या वादातून निर्माण होणारे प्रश्न आणि शाब्दिक आणि शारीरिक छळ हे महिलांवरील मुख्य अन्याय आहेत. त्यांच्या भीतीमुळे आणि अज्ञानामुळे या महिला घाबरलेल्या आसतात. तेव्हा या महिलांनी कोणतीही भीती न बाळगता त्यांच्या समस्या घेऊन आयोगाकडे यावे. नक्कीच महिला आयोग त्यांच्या समस्यांना सोडवण्याच्या प्रयत्न करेल, असे राज्य महिला आयोग अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी सांगितले.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी नातेपुते येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे युवक काँग्रेस प्रदेश सचिव अक्षय भांड व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते यांनी माळशिरस तालुक्याच्या वतीने रूपालीताई चाकणकर यांचा सत्कार केला. यावेळी नातेपुते नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, डॉ.नंदकुमार कवितके, उमेश पलंगे, निजाम काझी, रियाज शेख, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भांडणाचा राग मनात धरून दोन गटात हाणामारी ; परस्पर विरोधी गुन्हे दाखल

**सुराज्य/सोलापूर**

दहा वर्षांपूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून सचिन अलकुंटे,मनोज अलकुंटे,गणेश बांडेकर तेजा पवार (सर्व.रा.सोलापूर) यांनी फिर्यादी चेतन सुरेश धोत्रे यांना शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.तसेच सचिन याने हातात दुचाकीची चावी धरून बुक्की मारून जखमी केले.

ही घटना २२ जून रोजी बाळीवेस येथे रात्री साडेनऊ वाजण्याच्यासुमारासघडली.याप्रकरणी चेतन धोत्रे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्याच्या फिर्यादीवरून सचिन अलकुंटे, मनोज अलकुंटे,गणेश बांडेकर, तेजा पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक मुलाणी हे करीत आहेत.

तर दुसऱ्या घटनेत निर्मला राजू धोत्रे,सुनिता सुरेश धोत्रे,शांता धोत्रे,मयूर धोत्रे (सर्व.रा.सोलापूर) यांनी ज्योती सचिन अलकुंटे (वय-२५,रा.बुधवार पेठ) यांच्या घराच्या गेटला लाथ मारून घरात आले. त्यानंतर फिर्यादी ज्योती यांना शिवीगाळ करत हाताने मारहाण केली.यावेळी फिर्यादी यांची नणंद भांडण सोडवण्यासाठी मध्ये आली असता त्यांना देखील मारहाण करत मयूर धोत्रे याने फिर्यादी ज्योती यांना मी तुला गल्लीत राहू देणार नाही असे म्हणून दम दिला आहे.याप्रकरणी ज्योती अलकुंटे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून निर्मला धोत्रे,सुनीता धोत्रे,शांता धोत्रे,मयूर धोत्रे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.




## सद्गुरु संजीव स्वामी महाराज यांच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**सुराज्य/नाझरे**

**जाऊ देवाचिया गावा**
**देव देईन विसांवा**
**देवा सांगे सुखदुःख**
**देव निवारील भूक!!**

या संत रचनेनुसार पंढरीच्या विठुरायाला आपली सुख दुःख सांगण्यासाठी संजीव आश्रम मधील सर्व वारकरी सद्गुरू संजीव स्वामी यांच्या पालखी सह पंढरपूर कडे रवाना झाले.

श्री दत्त मंदिर नाझरे वझरे येथील श्री संजीव स्वामी यांची पालखी नाझरेतून वझरे येथे पवार यांच्या मळ्यात विसावली. कै. दत्तू लक्ष्मण पवार व कै. श्रीरंग दत्तू पवार यांनी यापूर्वी जोपासलेली सेवा यापुढेही पवार कुटुंबाने सुरू ठेवली असून यावेळी आबा पवार यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. मेजर लक्ष्मण पवार यांनी बनवलेले भोजन करून संजीव भक्त तृप्त झाले. दर वर्षी पवार कुटुंबीय चांगली सेवा देतात असे सांगितले. जन्माला येऊन एकदा तरी वारीला जावे यामधून मिळणारा आनंद आयुष्याला पुरणारा असतो. हाच विचार घेऊन आम्ही वारीसाठी अबाल वृद्ध महिला व सर्व संजीव भक्त चाललो आहोत, असे प्रकाश माने यांनी सांगितले.




# केसीआर बाय कार सोलापुरात येण्याची शक्यता

## मुलगा केटीआर अन् जावई हरीश राव असणार सोबत

**सुराज्य/सोलापूर**

तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे २६ जून रोजी सोलापूर दौऱ्यांवर येणार आहेत. मात्र त्यांच्या दौऱ्यामध्ये बदल झाला आहे. हेलिकॉप्टर ऐवजी बाय कार सोलापुरात येणार असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या समवेत चिरंजीव केटीआर आणि जावई तथा तेलंगणचे अर्थमंत्री हरीश राव हे असणार आहेत. केसीआर यांच्या नियोजनासाठी एक माजी केंद्रीय मंत्री आणि दोन मंत्र्यांनी रविवारी सोलापुरात येऊन एका फाइव्ह स्टार हॉटेलचा ताबा घेतला व नियोजनाची तयारी सुरू केली आहे.

राव यांनी सोलापूरवर राजकीयदृष्ट्या लक्ष केंद्रीत केले आहे. मात्र सोलापुरात त्यांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळला नाही. सोलापुरात केसीआर यांना ताकदवान नेता हाती लागलेला नाही. त्यामुळे त्यांनी



आपल्या राजकिय शक्ती प्रदर्शनासाठी पंढरपुर तालुका निश्चित केला आहे. बीआरएससाठी आता सोलापूर ऐवजी आता पंढरपूर तालुका हे सेंटर केले आहे. आषाढीवारीच्या दर्शनाच्या निमित्ताने पंढरपुरात येऊन केसीआर मोठे शक्तिप्रदर्शन करणार आहेत. त्यांच्या नियोजनाची लगबग सध्या सोलापुरातील एका एका फाइव्ह स्टार हॉटेल मध्ये चालू आहे.

रविवारी या योजनासाठी खास हेलिकॉप्टरने माजी केंद्रींमंत्री वेणूगोपाल चारी, मुख्यमंत्र्यांचे नातेवाईक के. वामश्री आणि आमदार बालसुसमन हे सोालापुरात दाखल झाले आहेत. मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे सोलापूर विमानतळावर येणार होते. मात्र त्यांच्या सोलापूर दौऱ्यामध्ये बदल झाल्याचे सांगण्यात येत आहे. आता केसीआर हे तेलंगणा येथून बाय कारने येणार असल्याची शक्यता आहे. सोमवारी त्यांचे सोलापूरात अअगमन होणार आहे. त्यांच्यासोबत तेलंगणातील मंत्रिमंडळ, आमदार अन् पक्षाचे प्रमुख पदाधिकारी अशा एकूण तीनशे लोकांचा आणि दीडशेहून अधिक गाड्यांचा ताफा त्यांच्यासोबत असणार आहे. यासर्वांचा मुक्काम सोलापुरातील एका फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये असणार आहे.

यावेळी केसीआर हे उद्योजकांशी संवाद साधणार आहेत. विमानसेवा अन् उद्योगवाढीवर चर्चा करणार आहेत. मंगळवारी सकाळी पंढरपूरकडे रवाना होणार आहेत. त्यापूर्वी माजी खासदार धर्मण्णा सादूल यांच्या निवासस्थानी जाणार आहेत. त्यामुळे सोलापुरातील त्या हॉटेल परिसरात रविवारी रात्रीपासूनच बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



## वारकऱ्यांची वारी आरोग्यदायी व्हावी : राजकुमार हिवरकर- पाटील

✔ **नातेपुते** : संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीसोबत चालणाऱ्या वारकऱ्यांची वारी आरोग्यदायी व्हावी यासाठी आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून, जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुका शिवसेनेच्या वतीने तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर -पाटील यांनी १२६० रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा व मोफत औषधोपचार करून वारकऱ्यांची वारी आरोग्यदायी केली.औषधोपचार केंद्रास पुणे मंडळाचे उपसंचालक डॉ. राधाकिसन पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सोनिया बागडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बिरू या मोफत दवाखाना व दूधभाते, आरकेएस समन्वयक प्रदीप नामदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र मोहिते यांनी भेट देऊन रुग्णांची विचारपूस केली. यावेळी रक्तदाब, संधिवात, व्हायरल इन्फेक्शन,मलमपट्टी, चक्कर, अंगदुखी, जुलाब, उलट्या यासह विविध प्रकारचे १२६० रुग्ण डॉ. सुचिता आंधळकर, आरोग्य सेविका एस. आर. हिवाळे, एस. एस. ठोंबरे, आशा सेविका ए. आर. लांडगे, एस. एस. देवकते, व्हि.. आर. भुसारे, डी. जे. ठोंबरे, पी. डी. पलंगे, जी. आर. पलंगे, ए. ए. तांबडे, एम.पी.इंगोले, एस. एस. ठोंबरे यांनी रुग्णांना रुग्णसेवा व औषधोपचार केले. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर- पाटील, शहर प्रमुख पोपटराव शिंदे, गटनेते दादा मुलाणी, भाजपचे मनोज जाधव, मीडिया प्रमुख सुनील बनकर, जय महाराष्ट्र बांधकाम संघटनेचे राजू जाधव, विकी करे, माऊली रुपनवर, रामभाऊ वाघमोडे, दत्ता बोडरे आदीसह शिवसैनिक उपस्थित होते.



## शंकर कारखान्यावर प्रतापसिंह मोहिते-पाटील यांची जयंती साजरी

✔ **अकलूज** : श्री शंकर सह साखर कारखाना लि. सदाशिवनगर कारखाना स्थळावर लोकनेते कै. प्रतापसिंह शंकरराव मोहिते - पाटील यांची जंयती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पुजन कारखान्याचे जेष्ठ संचालक रामदास कर्णे यांचे हस्ते करण्यात आले यावेळी माळशिरस पंचायत समिती चे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील ,कारखान्याचे संचालक सुनिल माने, नंदन दाते, कारखान्याचे जनरल मॅनेजर रविराज जगताप,मुख्य शेतकी अधिकारी आनंदराव गायकवाड, प्रभाकर गायकवाड, लेबर ऑफिसर कैलास कदम, वर्कस मॅनेजर प्रफुल्ल चव्हाण, सिव्हील इंजिनिअर राहुल मगर, सिक्युरिटी ऑफिसर ज्ञानदेव पवार डिसलरी मॅनेजर, संजय मोरे चिप अकाउंटंट शेंडगे , उदय पाटील व कामगार उपस्थित होते.

## पालखी मार्गस्थ होताच अकलूजमध्ये दोन तासात १५ टन कचऱ्याची सफाई

✔ **अकलूज** : पालखी मार्गावरील कोणत्याही गावातून पालखी मार्गस्थ झाल्यानंतर स्वच्छतेची खूप मोठी समस्या निर्माण होते. परंतु अकलूज नगपरिषदेने हे आव्हान स्विकारून केवळ दोन तासातच अकलूज चकाचक केल्याने गावातील नागरीकांतून स्वच्छता कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी चे शनिवार दि.२४ रोजी अकलूज मध्ये आगमन झाले होते. पालखी बरोबरच्या लाखो वारकऱ्यांना सर्वतोपरी सुविधा देताना अकलूज नगरपरिषदेचे कर्मचारी रात्रंदिवस एक करून परीश्रम घेत होते. कालचा मुक्काम आटोपून आज सकाळी पालखीने माळीनगर कडे प्रस्थान केले.संत तुकारामांची पालखी मार्गस्थ होताच अकलूज नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेच्या सुमारे १७० कर्मचाऱ्यांनी २० घंटागाड्या व १० पाणी टँकर, मैला टँकर च्या सहाय्याने केवळ दोन तासाच अकलूज गाव चकाचक केले. या साफसफाईमध्ये सुमारे १५ टन कचरा गोळा करण्यात आला.कमी वेळात अकलूज नगरपरिषदेने नियोजनबध्द साफसफाईने अकलूज परिसरातील नागरीकांतून स्वच्छता कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## कचरा पेटवल्याच्या कारणावरून दोघांना मारहाण; गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : कचरा पेटवल्याच्या कारणावरून मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे.फिर्यादी दयानंद गौरीशंकर काळमंडे (वय-३५,रा.कलावती नगर) यांनी मारुती मंदिराच्या बाजूला असलेला कचरा का पेटवला या कारणावरून बालाजी बंडगर यांनी शिवीगाळ करून दयानंद यांची आई प्रभावती यांच्या तोंडावर ठोसा मारला.त्यावेळी फिर्यादी यांनी बालाजी याला विचारणा करण्यासाठी गेले असता,बालाजी याने दगड डोक्यात मारून फिर्यादींना जखमी केले.दरम्यान,फिर्यादी यांचा भाऊ चिदानंद हा भांडण सोडवण्यासाठी आला असता,त्याला देखील शिवीगाळ करत दगडाने मारहाण करून जखमी केले आहे.ही घटना २३ जून रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास कलावती नगर येथे घडली.याप्रकरणी दयानंद काळमंडे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून बालाजी बंडगर (रा.कलावती नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

## काढून टाकलेल्या केसचा राग मनात धरून मारहाण

✔ **सोलापूर** : सन २०२१ मध्ये प्रॉपर्टी बाबत केस उच्च न्यायालय मुंबई येथील काढून टाकल्याचा राग मनात धरून फिर्यादी संगीता नंदकिशोर सारडा (वय-५७,रा.उत्तर कसबा,टिळक रोड) यांच्या राहत्या घरी फिर्यादी व त्यांच्या पतीस मारहाण करून शिवीगाळ केली.ही घटना २३ जून रोजी सायंकाळी पाच वाजता सुमारास घडली.शिवाय संशयित आरोपी संतोष शहा याने साडेपाच वाजता घराच्या तळमजल्यावर डिझेल ओतले.त्यानंतर संतोष शहा व संकेत शहा यांनी मिळून फिर्यादी व फिर्यादी यांच्या पतीस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.याप्रकरणी संगीता सारडा यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून संतोष शहा व संकेत शहा यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक देशमुख हे करीत आहेत.

### राष्ट्रवादी ला जिल्ह्यात खिंडार

# भगीरथ भालके पक्षाला सोडचिठ्ठी देत उद्या बीएसआरमध्ये करणार प्रवेश

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला अखेर मोठा खिंडार पडले असून राष्ट्रवादीचे नेते आणि पंढरपूर - मंगळवेढा मतदारसंघाचे विधानसभेचे पराभूत उमेदवार भगीरथ भालके यांनी आपण २७ जून रोजी कार्यकर्त्यासह भारत राष्ट्र समिती (बीएसआर) या पक्षात प्रवेश करणार असल्याची घोषणा केली आहे. पंढरपूर येथील भालके समर्थक, कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या बैठकीतनंतर भगीरथ भालके यांनी ही माहिती दिली.**

गेल्या ९ मे रोजी पंढरपुरात विठ्ठल सहकारी कारखान्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत बायो-सीएनजी प्रकल्पाचे भूमिपूजन आणि शेतकरी मेळावा झाला होता. त्यावेळी कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. विठ्ठल साखर कारखान्याच्या सत्ताकारणात याच वर्षी अभिजित पाटील यांनी बाजी मारून भगीरथ भालके यांना जोरदार धक्का दिला होता. पुन्हा याच अभिजित पाटील यांना शरद पवार यांनी जवळ केल्यामुळे भगीरथ भालके यांच्यासह पक्षाचे पंढरपुरातील कार्यकर्ते सुध्दा दुखावले आहेत. विश्वासात न घेता अभिजित पाटील यांना राष्ट्रवादीत प्रवेश दिला असताना दुसरीकडे पक्षाच्या स्तरावर भालके यांची होईल तितकी कोंडी करण्याचा प्रयत्न झाल्यामुळे त्यांचा स्वाभिमान दुखावला होता.

आज कार्यकर्त्यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयामुळे राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला आहे. कारण त्यांनी पोटनिवडणुकीत एक लाखापेक्षा अधिक मते घेतली आहेत. त्यामुळे भालके यांच्या पक्ष सोडण्याचे परिणाम पंढरपुरात आगामी निवडणुकीत दिसण्याची शक्यता आहे.

### कार्यकर्त्यांनी दिला 'अब की बार किसान सरकार'चा नारा




मागील काही दिवसांपासून भगीरथ भालके हे बीआरएस पक्षात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा सुरू होती. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी त्यांच्यासाठी खास विमान पाठविले होते, त्या विमानाने जाऊन भालके यांनी केसीआर यांची हैदराबाद येथे जाऊन केली होती. त्यानंतर भालके यांच्या बीआरएसमध्ये जाण्याची शक्यता बळावली होती. आज भालके यांनी अधिकृत बीआरएस पक्षात प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले. त्यांच्या निर्णयाचे पंढरपूर व मंगळवेढा येथील कार्यकर्त्यांनी स्वागत केले.

तेलंगणाचे मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव हे आषाढी एकादशीच्या निमित्ताने २% जून रोजी पंढरपूरला येणार आहेत. या दरम्यान सकाळी सरकोली येथे शेतकरी मेळावा होणार आहे. या मेळाव्यात भालके आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह बीआरएसमध्ये प्रवेश करणार आहेत.

**जनता हाच माझा पक्ष**

स्व.आ.भारत नाना हे जनतेला विचारल्याशिवाय कोणताही राजकीय निर्णय घेत नव्हते. त्याच पद्धतीने सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांना विचारून हा निर्णय घेतला आहे.तेलंगणा मध्ये शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य दर दिला जातो.त्याच पद्धतीने महाराष्ट्रात सुद्धा मिळवा यासाठी बीआरएस पक्ष काम करणार आहे. राज्यात दुधाला कवडीची किंमत मिळत असल्याने शेतकरी नाराज आहेत. परंतु भविष्यात तेलंगणा सरकार आपल्याकडील दुध जादा दराने खरेदी करणार आहे. शेतकऱ्यांच्या मालाला घामाचा दाम मिळवून देण्यासाठी यापुढे काम करणार आहे

**- भगिरथ भालके**

# पिण्याच्या पाण्यासाठी किणीमोड तांड्याची वणवण

### ग्रामपंचायतीच्या ढिसाळपणामुळे किणीमोडकरांची कोंडी

✔ सुराज्य/अक्कलकोट

तालुक्यातील सांगवी बु ग्रुप ग्रामपंचायत मधील किणीमोड तांडा येथे ग्रामपंचायतीच्या नाकर्तेपणा मुळे दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्या पासून अगदी ६ की मी अंतरावर असलेल्या सांगवी बु ग्रुप ग्रामपंचायत मधील किणीमोड तांडा गावात पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावे लागत असल्याचे विदारक चित्र तांड्यात पहावयास मिळत असून, कोणी गाडीवर, तर कुणी सायकलवर, तर कुणी चालत आशा साधनांचा उपयोग करत पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करतानाचे चित्र सध्या तांड्यात पहावयास मिळत आहे.

**दिवसभर रानात काम करायचं अन् पाण्यासाठी शेतशिवार फिरायचं? हे किती दिवस चालायचं ?**

गेल्या २ वर्षांपासून सांगवी बु जलाशयातून पाणी पुरवठा होत होता. पण काही कारणास्तव नवीन पाईप लाईन नादुरुस्त झाली , पण याचाच गैर फायदा घेत गावातला गावगुंड तांड्याला पाणी पुरवठा करतो म्हणून गावातल्या विद्युत डीपीवरून २४ तास लाईट चा वापर करून स्वतः च्या शेतीसाठी पाणी वापर करत होता. या गावगुंडावर ग्रामपंचायतीने कारवाई करणे अपेक्षित होते मात्र हे तर त्यांच्याच आशिर्वादाने चालल्यामुळे कारवाई तर सोडाच उलट या गावगुंडाला प्रोत्साहन दिले जात असल्याची चर्चा रंगली आहे. या गंभीर बाबींकडे बीडीओ , तहसीलदार, व सीईओ, यांनी तातडीने लक्ष घालून स्थनिक चौकशी करून संबंधित गावगुंडावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी गावातून जोर धरू लागली आहे.

तांड्याला एक हातपंप असून, तेही पाणी पिण्यासाठी योग्य नसल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे असून, ग्रामपंचायतिच्या माध्यमातुन गतवर्षी टीसीएल पावडर त्यामध्ये टाकण्यात आली होती पण, त्याचा काहीच उपयोग झाला नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस असून, या हातपपा जवळ दलदली असल्याने पडलेले पाणी या हातपंपाच्या जवळच मुरत असल्याने तेच पाणी जमिनीच्या खालच्या भागात जाऊन पाणी दूषित होण्यास मदत होते. आणि हातपंपावर पाणी उपसा केल्यास हेच दूषित पाणी नागरिकांना प्यायला मिळते. असे गावातील नागरिकांचे म्हणणे असून, ग्रामपंचायतीने त्याच्यावर काहीतरी कायमस्वरूपी उपाययोजना करून पिण्याच्या पाण्याची सोय करावी. अशी मागणी महिला वर्गातून होत आहे. दिवसभर रानात कामे करून यायची आणि पिण्याच्या पाण्यासाठी परत शेतशिवार फिरायचं असे किती दिवस चालणार ? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## धनशेट्टी यांना श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

✔ सुराज्य/अक्कलकोट

श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीने दिला जाणारा यंदाचा मानाचा गुणीजन, आदर्श पत्रकार पुरस्कार अक्कलकोट तालुका ग्रामीण पत्रकार संघाचे विद्यमान अध्यक्ष व सुराज्य चे तालुका प्रतिनिधी,पत्रकार रविकांत धनशेट्टी यांना जाहीर झाला.



धार्मिक व सामाजिक क्षेत्रात आदर्शवत ठरलेल्या श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी पत्रकार रविकांत धनशेट्टी यांना आदर्श पत्रकार म्हणून घोषित केल्याने सर्वत्र अभिनंदन होत आहे.श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ व्या वर्धापन दिन आणि श्री गुरुपौर्णिमा उत्सव दिनाचे औचित्य साधून शुक्रवार, दि.३० जून रोजी सायं ६:३० वाजता अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते पत्रकार रविकांत धनशेट्टी यांना आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

## डॉक्टर्स डे निमित्त सहा डॉक्टरांचा होणार सन्मान


डॉ.सौ. माधुरी दबडे


डॉ.सोनिया बागडे


डॉ. सिध्देश्वर रुद्राक्षी


डॉ. व्यंकटेश मेतन


डॉ. फहिम गोलीवाले


डॉ. हर्षवर्धन जोशी

✔ सुराज्य/सोलापूर

डॉक्टर्स डे निमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, शाखा सोलापूर व अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र, सोलापूर यांच्या सहकार्याने सोलापूर शहरातील वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देत असलेल्या डॉक्टरांचा सत्कार समारंभ आयोजित केला आहे.

डॉक्टर्स डे च्या पूर्वसंध्येला शुक्रवार दि. ३० जून रोजी दुपारी ठीक ४ वाजता अश्विनी सहकारी रुग्णालयाच्या सेमिनार हॉलमध्ये सोलापूरातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांच्या हस्ते व अश्विनी सहकारी रुग्णालयाचे चेअरमन बिपिनभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे, सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. माधुरी दबडे, सोलापूर कॅन्सर सेंटरचे सुप्रसिद्ध कॅन्सर सर्जन डॉ. फहीम गोलीवाले, सुप्रसिद्ध फिजिशियन डॉ. हर्षवर्धन जोशी, सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ञ डॉ. व्यंकटेश मेतन, अश्विनी सहकारी रुग्णालयातील सुप्रसिद्ध फिजिशियन डॉ. सिद्धेश्वर रुद्राक्षी यांना सन्मानित केले जाणार आहे.या समारंभास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्राचार्य के.एम. जमादार, मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. राजीव प्रधान, सचिव जयेशभाई पटेल यांनी केले आहे.

## सरकारी कामात अडथळा; उच्च न्यायालयातून ११ जणांना जामीन

✔ सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव येथील सरकारी कर्मचारीस मोजणी करताना अडसर केल्याप्रकरणी ११ जणांना जामीनवर सोडण्याचे आदेश मुंबई येथील न्यायमूर्ती अनुजा प्रभू देसाई यांनी सुनावली.

यात इशक इनायआली पटेल, नुरजहा मुर्तूज पटेल, नौशाद जफर जमादार, शोहेब इशक पटेल, नरसी अहमद पटेल यांना अटकपूर्व जामीन तर खालील अहमद पटेल, आताऊल्ला हुसेन भाशा पटेल , खालील मुल्ला हुसेन भाषा पटेल, सईद मनोरुद्दीन पटेल, समीर मनोरुद्दीन पटेल, चुमन तायाबली जागीरदार या आरोपींना जामीनावर सुटका करण्यात आली.सर्व आरोपींचा जिल्हा व सत्र न्यायालय येथे अटकपूर्व जामीन व जामीन अर्ज दाखल केल्यानंतर ते अर्ज नामंजूर केले होते. नंतर आरोपींनी याप्रकरणी उच्च न्यायालय येथे अटकपूर्व जामीन व जामीन अर्ज दाखल केला होता. यात आरोपीतर्फे ॲड. विक्रांत फताटे तर सरकारतर्फे ॲड. पेठे यांनी काम पाहिले



## कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

✔ सुराज्य/वेळापूर

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२३-२४ च्या गळीत हंगामाचा मिल रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक (मालक) यांचे शुभहस्ते व व्हा.चेअरमन कैलास खुळे, सर्व संचालक आणि कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी आणि अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन मा. आ. श्री. प्रशांतराव परिचारक (मालक) यांनी सांगितले की, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात या गळीत हंगामासाठी सुमारे १२ लाख मे.टनाच्या ऊस नोंदी असुन या सर्व ऊसाचे गाळप करण्याच्या दृष्टीने कारखान्याने तोडणी वाहतुक यंत्रणेचे करार केले असुन त्यांना लवकरच ॲडव्हांन्स हप्त्याचे वाटप करणार आहोत. कारखान्याने मागील गळीत हंगामात ९,६१,१०० मे.टन ऊस गाळप करुन ९,५५,५९० क्वि.साखर पोती उत्पादित केलेली आहेत आणि आसवानी प्रकल्पातून १.६० कोटी लिटर व को-जन प्रकल्पामधून ६.७१ कोटी युनिट विज निर्मीती केलेली आहे. येणारा गळीत हंगाम २०२३-२४ हा कारखाना ९००० मे.टन प्रतिदिन गाळप क्षमतेने चालणार असून त्यासाठी कारखाना विस्तारीकरणाची कामे प्रगती पथावर आहेत. ती सर्व कामे वेळेत पुर्ण करुन ऑक्टोंबर महिन्याच्या सुरुवातीस कारखाना गाळपासठी सज्ज होईल. त्यामुळे येणाज्या या गळीत हंगामात कमी दिवसात जास्तीचे गाळप करण्याचा कारखाना व्यवस्थापणाचा मानस आहे.

यावेळी बोलताना कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी सांगीतले की, कारखान्याने गत हंगामातील ऊसाची बिले, तोडणी वाहतुक यंत्रणेची बिले वेळेवर दिली असुन कामगारांचे पगार वेळेवर देत असुन कारखान्याकडे कोणत्याही प्रकारची बँकांची कर्जे थकीत नाहीत. मील, बॉयलर, ई.टी.पी. इत्यादीची कामे संबंधीत कंत्राटदार वेळेवर पुर्ण करणार आहेत. त्यासाठी आवश्यक असणारी यंत्र सामग्री कारखाना कार्यस्थळावर येत आहे.

यावेळी कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे, वसंतराव देशमुख, दिलीप चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वाघमोडे, बाळासो यलमर, भगवान चौगुले, भास्कर कसगावडे, भैरू वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हणमंत कदम, किसन सरवदे, शामराव साळुंखे, राणु पाटील, तज्ञ संचालक दाजी पाटील, दिलीप गुरव व अधिकारी उपस्थित होते .

# भावभक्ती गीतांजली कार्यक्रमाने हजारो श्रोते मंत्रमुग्ध

✔ सुराज्य/अक्कलकोट

लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते सौ. प्रतिभा थोरात व सहकलाकार पुणे यांचा भावभक्ती गीतांजली' या कार्यक्रमात अक्कलकोट शहरातील हजारो श्रोत्यांनी त्यांच्या गायन कलेने मंत्रमुग्ध होऊन विशेष आनंद घेतला. यास प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, शनिवार सायंकाळी ७ वा. भावभक्ती गीतांजली' लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते सौ. प्रतिभा थोरात व सहकलाकार पुणे यांचा कार्यक्रमाचे दुसरे पुष्प संपन्न झाले.



या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन भूमिअभिलेखच्या उपअधिक्षक संतोष बिराजदार, उद्योजक लाला राठोड, माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, लेखापरीक्षक ओंकारेश्वर उटगे, ॲड. संतोष खोबरे व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते सौ. प्रतिभा थोरात आणि सहकलाकार जब्बार मुर्षद, धनंजय आंबेकर, अमीर हुंडेकरी, सौ. सायली साठे, पूनम लांडे, स्नेहा कसबे, उर्मिला विजापुरे, डॉ.विनय थोरात, संदीप उबाळे, अक्षय म्हपराळकर यांच्यासह मान्यवरांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, अक्षता खोबरे, कोमल खोबरे, जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल मचाले, संपदा श्रीमान व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, राजेंद्र लिंबीतोटे, एबीपी माझाचे कॅमेरामन आयुब शेख, प्रा. शरणप्पा आचलेर, योगेश पवार, उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले.

**गुणीजन गौरव :**

यामध्ये विशेष गौरव पुरस्कार निवृत्त शिक्षक महमद हनिफ अब्बासअली उर्फ चाचा बिराजदार व स्टेट बँक ऑफ इंडिया अक्कलकोट शाखेचे व्यवस्थापक विकास खडतर, एबीपी माझाचे सोलापूर जिल्हा प्रतिनिधी आफताब शेख, ए.पी.आय इंद्रजित वर्धन, शिक्षिका श्रीमती रिंकू अनंतराव जाधवर यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.






# वरुण राजा बरसला, वारकरी जोमाने सुखावला

## वेळापुरात ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा विसावला

सुराज्य/महादेव जाधव

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ग्रामदैवत अर्धनारी नटेश्वर च्या वेळापूर नगरींत तोफांच्या सलामींने उत्साही भक्तिमय वातावरणात वैष्णवांचा हरिनामाच्या जयघोषात स्वागत करण्यात आले. वेळापूर ग्रामपंचायत च्या वतींने वेळापुर परिसरात शनिवारी पाऊस पडल्याने रविवारीही थोडासा पाऊस पडल्याने व ढगाळ वातावरण असल्याने वैष्णाव हवेत गारवा निर्माण झाल्याने आनंद व्यक्त करत पंढरीच्या दिशेने माऊलींचा जय घोष करीत पुढे पाऊले टाकत आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा मार्केट कमिटीचे संचालक उत्तमराव जानकर व धानोरे माजी सरपंच जीवन जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळ्याचे नियोजन केले होते.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा वेळापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीत ३.४० वाजता येताच वेळापूर ग्रामपंचायतीचे नूतन सरपंच रजनीश बनसोडे व उपसरपंच तानाजीकाका चव्हाण यांच्यावतीने पालखी सोहळ्याचे तोफांची सलामी देऊन वेळापूर वेळापूर ग्रामपंचायतीचे गटनेते संजयआबा मंडले, ग्रामपंचायत सदस्य डॉ. स्नेहलताई जीवन जानकर, नानासाहेब मुंगूसकर, हनुमंत वायदंडे, प्रियंका आडत, सीमा खाडे, सिमरन मुलाणी, अंजना माने, विमल जाधव, छाया साठे, यांच्यावतीने पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले.

माळशिरस येथील मुक्कामानंतर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा वेळापूरनगरी कडे मुक्कामासाठी निघाला. विठ्ठल नामाचा जयघोष व टाळ मृदंगाच्या गजरामुळे आसमंत दुमदुमून गेला होता. पिसेवाडी फाटा व इको बोर्ड येथे ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती तर वेळापूर येथे माऊलींच्या दर्शनासाठी भाविक व ग्रामस्थांनी दुपारपासूनच गर्दी केली होती.

**! तुका म्हणे धावा आहे पंढरी विसावा !**

या तुकाराम महाराजांच्या उक्ती प्रमाणे वैष्णवांची पावले विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने धुमाळी या उतारावरून वैष्णवांनी धावा घेऊन पंढरी समीप आल्याचा आनंद व्यक्त केला. विसाव्याच्या ठिकाणी आल्यानंतर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांची विसावा येथे ॲड. रामचंद्र ताटे व सौ अश्विनी ताटे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पालखी विसावा कट्ट्याचे सेवेकरी ह. भ. प. महादेवभाऊ ताटे यांचा पालखी विश्वस्त यांनी श्रीफळ व प्रसाद देऊन सन्मान केला. यानंतर विसावा येथे परंपरेप्रमाणे शेंडगे यांची तीन नंबरची दिंडी यांच्या वतीने मानाचे भारुड केले जाते. सदर भारुड लक्ष्मण राजगुरू व इतरांनी सादर केले. यावेळी भक्तीमध्ये तल्लीन होऊन वैष्णवांची विविध सोंगे सादर करून भारुड संपन्न झाले. यानंतर माऊलींची पालखी तरुणांनी खांद्यावर घेऊन ज्ञानेश्वर माऊलींचा जयघोष करत पालखी चौकातील विश्रांतीच्या ठिकाणी येत असताना मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांवर पुष्पवृष्टी केली.



सायंकाळी ६ सुमारास पालखी सोहळा वेळापूर नगरीत पोहचल्यानंतर भाविकांनी दर्शनासाठी एकच गर्दी केली होती. त्यामुळे परिसर भक्ती रसात नाहून निघाला होता. पालखी तळावर ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांची समाज आरती झाल्यानंतर दिंडीतील वारकऱ्यांनी राहूट्याकडे धाव घेतली. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकाचे दर्शन घेण्यासाठी रात्रभर ग्रामस्थांची, वैष्णवांची गर्दी होती.

पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने आठ विहिरी ताब्यात घेऊन तेथून पालखी सोहळ्या बरोबर आलेल्या टँकर मध्ये पाणी भरण्याची सोय करण्यात आली होती.

वेळापूर येथील पालखी सोहळ्यातील मुक्कामी बंदोबस्त सोलापूर जिल्हा अधीक्षक शिरीष देशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत पाटील, अकलूज पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी पालखी सोहळा पार पाडण्यासाठी ७०० पोलीस कर्मचारी व अधिकारी यांचा बंदोबस्त चोख ठेवला होता. त्याचबरोबर पालखी सोहळ्यातील मुक्कामी वारकऱ्यांसाठी वेळापूर शहरातील १४ ठिकाणी १५०० मोबाईल टॉयलेटची आणि पाण्याची व लाईटची सोय करण्यात आली होती. त्याचबरोबर वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने पालखी चौक येथे आरोग्य विभाग कक्ष, हिरकणी कक्ष, चौकशी कक्ष याची उभारणी केली होती. त्याचबरोबर पालखी तळावरील वारकऱ्यांची स्वच्छ पाण्याची सोय होण्यासाठी १६ स्टॅन्ड पोस्टद्वारे उभारणी करण्यात आली होती. तसेच पालखीतळ व बुद्धविहार येथे महिलांसाठी विश्रांती कक्ष व स्नानगृहांची सोय करण्यात आली होती. पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना प्लास्टिक कचरा टाकण्यासाठी २० ठिकाणी सोय करण्यात आली होती. संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतळ हा परिसर प्रकाशमय करण्यात आला होता. महावितरणच्या वतीने २४ तास वीज सुरळीत देण्यासाठी सर्व कामे पूर्ण केलेली होती. वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने पालखी काळात भाविकांना पादुकांचे सुलभ दर्शन व्हावे यासाठी दर्शन रांगेची उत्तम अशी सोय करण्यात आली होती. आरोग्य विभागाच्या वतीने डॉ. बी. बी. ओव्हाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पालखीतळ, ठाकूरबूवा उघडेवाडी, तोंडले, बोंडले या चार ठिकाणी औषध उपचार केंद्राची उभारणी करून वारकऱ्यांची तपासणी करून औषध गोळ्यांचे वाटप केले गेले. पालखी तळ येथे हरितवारी अंतर्गत वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने रोपे लावून वृक्ष लागवड करण्यात आली.



## श्रीपूर मध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत

श्रीपुर तालुका माळशिरस येथे जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात वरुण राजाच्याआगमनाने आंनदी वातावरणात उत्साहात स्वागत करण्यात आले.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा अकलूज येथील मुक्काम संपवून पालखी सोहळा माळीनगर मार्गे तेथील विसावा घेऊन पंचविस /चार, महाळुंग मार्गे सायंकाळच्या सुमारास श्रीपुर मध्ये पोहोचला. श्रीपुर येथे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या प्रवेशद्वारावर कारखान्याचे माजी चेअरमन दिनकर भाऊ मोरे, दाजी पाटील, दिलीप चव्हाण, तानाजी वाघमोडे, भगवानराव चौगुले, गंगामामा विभुते, हनुमंत कदम, सुदाम मोरे, दिलीप गुरव ,कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी वर्ग यांनी पालखीतील पादुकाचे पूजन करून पालखी सोहळ्याचे स्वागत केले.

त्यानंतर पालखी सोहळा छत्रपती शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे ब्रिमा सागर डिस्टलरीज लिमिटेड श्रीपुर कारखान्याच्या प्रवेश दारावर कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर भरतकुमार शेठीया, कारखान्याचे जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, डेप्युटी मॅनेजर चंद्रकांत भागवत, नरेश पाठक यांच्यासह अधिकारी वर्ग, कामगार यांनी पादुकांचे दर्शन घेऊन पालखी सोहळ्याचे स्वागत केले. यावेळी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याने वारकऱ्यांना वडापाव व केळीचे वाटप केले तर ब्रिमा सागर डिस्टलरीज लिमिटेड श्रीपुर कारखान्याने पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना मसालेभात, चहा, केळीचे वाटप करण्यात आले. यानंतर पालखी सोहळा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकातून हनुमान मंदिर येथे येऊन भाविकांना दर्शनासाठी पालखी सोहळा थांबला. जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील पादुकांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. तसेच पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना ठिकठिकाणी व मंडळांच्यावतिने भोजनाची नाश्त्याची, चहाची सोय करण्यात आलेली होती. यानंतर पालखी सोहळ्याने श्रीपुर होऊन मुक्कामासाठी बोरगाव कडे प्रस्थान केले.



बोंडले तालुका माळशिरस येथे श्री संत सोपान महाराज पालखी सोहळ्या तील वारकऱ्यांच्या स्वागताची सुंदर अशी रांगोळी जि. प. शिक्षिका गिरिजा नाईकवरे यांनी काढली.



## जि.प. पवारवस्ती शाळेत ज्ञानोबा-तुकारामाच्या जयघोषात दिंडी

**अकलूज** : बिजवडी येथील जिल्हा परिषद पवारवस्ती शाळेने भाळी चंदनाच्या टिळा..मुखी हरिनामाचा जयघोष..करत आषाढी वारीच्या निमित्ताने दिंडी सोहळ्याचे आयोजन केले होते. सोलापूर जिल्ह्यामध्ये संत तुकाराम व संत ज्ञानेश्वर महाराज पालखींचे आगमन होताच संपूर्ण जिल्ह्यामध्ये भक्तिमय वातावरण निर्माण होते. लहान थोरांबरोबरच बालचमूंच्या मनात देखील हा वैष्णवांच्या भक्तीमय मेळ्याबद्दल आकर्षण असते.आणि मग टाळ-मृदंगाच्या साथीने भक्तिमय वातावरणात न्हावून निघतात शाळकरी वारकरी.

भक्तीच्या वाटेवर विठुरायाच्या दर्शनासाठी व आशिर्वादासाठी वारकऱ्यांची पावले आसुसलेली असतात. तुझ्या भक्तीचा झरा असाच वाहू दे, 'पांडुरंगा', माझ्या माणसांना नेहमीच तुझ्या सहवासात राहू दे! असाच काहीसा संदेश घेऊन ती पंढरीच्या वाटेवर चालत असतात.आषाढी एकादशीला जमतात सारे वारकरी, टाळ मृदंगाच्या जयघोषात मग्न होतात शाळकरी मुले, बघून सारे दृश्य. मन होते प्रसन्न, जणू स्वर्गच उतरला धरतीवर.असेच दिंडी सोहळ्याने वाटत होते.दिंडीच्या सुरुवातीलाच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची अतिशय उत्तम अशी नाश्त्याची सोय ज्योतीराम यादव यांनी केली होती. त्यानंतर पायी दिंडी ज्ञानोबा - तुकारामाचा जयघोष करत रस्त्यावरून चालत असताना जागोजागी महिला पालकांनी विठ्ठल-रुक्मिणीचे व संत मंडळी चे औक्षण केले. बाळासाहेब पवार यांच्या वस्तीवर विसावा घेण्यात आला.त्यांनी देखील बाल वारक-यांची उत्तम अशी नाश्त्याची सोय केली.सोहळ्यानंतर बालचमुंनी फुगडीचा आनंद घेतला.

## दुचाकी धडकल्याने दिंडीतील वारकरी जखमी

**सोलापूर** : दिंडी सोबत पायी जात असताना पाठीमागून दुचाकी धडकल्याने भास्कर गुलाबराव मरकट (वय ६० रा. गोंदी ता. अंबट जि. जालना) हे वारकरी गंभीर जखमी झाले.

हा अपघात पंढरपूरच्या जवळ रविवारी दुपारच्या सुमारास घडला. त्यांना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून बेशुद्ध अवस्थेत बाळासाहेब मरकट (पुतण्या ) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले .या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## उजनीतून सोडलेलं पाणी चंद्रभागेत दाखल

**▶▶ चंद्रभागा वाळवंटी, भक्तांची दाटी...**

**▶▶ वारकऱ्यांना मुबलक पाण्यात करता येणार पवित्र स्नान**

सुराज्य/सोलापूर

पंढरीचा वास चंद्रभागे स्नान।आणिक दर्शन विठोबाचे||हेचि घडो मज जन्मजन्मांतरी।मागणे श्रीहरी नाही दुजे||'या संतवचनाप्रमाणे चंद्रभागा स्नानाला अधिक महत्त्व आहे. त्यामुळे आषाढी वारी सोहळ्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशासह अन्य भागातील भाविक पंढरीत दाखल होताच आपापल्या मठात, मंदिरात, धर्मशाळेत साहित्य ठेवून विश्रांती न घेता त्यांची पावले आपोआपच चंद्रभागेकडे वळत होती. सध्या चंद्रभागा नदीपात्रात भरपूर पाणी आहे. स्वच्छ, निर्मळ आणि वाहते पाणी असल्याने पवित्र स्नान करण्यासाठी चंद्रभागा वाळवंटी भाविकांची दाटी' झाल्याचे दिसून येत आहे.

आषाढी वारी सोहळ्यात भाविकांचे हाल होऊ नये म्हणून उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यात आले असून ते पाणी चंद्रभागा पात्रात दाखल झाल्याने भाविकांना स्वच्छ, निर्मळ अन् वाहत्या पाण्यात पवित्र स्नान करण्याची संधी मिळत आहे. स्नान झाल्यानंतर ज्या भक्तराज पुंडलिकाला दर्शन देण्यासाठी परब्रह्म परमात्मा पांडुरंग आला आणि त्यांच्या प्रार्थनेनुसार त्याने दिलेल्या विटेवर युगे अठ्ठावीस भक्तांना दर्शन देऊन कृतार्थ करण्यासाठी भीमातीरी उभा राहिला आहे. त्यामुळे भाविक प्रथम त्या भक्त पुंडलिकाचे दर्शन घेतात.त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेण्यासाठी दर्शनरांगेकडे मार्गस्थ होतात.

गेल्या काही दिवसात प्रशासनाने चंद्रभागा पात्र आणि वाळवंटातून कचरा, जुने कपडे काढण्यात आले आहेत. परिसरात स्वच्छता करण्यात आली आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपर्यंत चंद्रभागेची अवस्था गटार गंगेसारखी झाल्याचं वास्तव मिडीयाने समोर आणल्यावर प्रशासनाला जाग आली होती. त्यानंतर चंद्रभागेच्या सफाई करण्यात आली आहे.

चंद्रभागेत झालेल्या घाणीमुळं पाण्याला अतिशय दुर्गंधी येत होती. अशा पाण्यात स्नान करताना भाविकांना आरोग्याचे प्रश्न उभे राहिले होते. आता नदी पात्रातील ही घाण काढून घेतल्यानं आणि नवे स्वच्छ पाणी आल्यानं भाविकांना स्वच्छ आणि मुबलक पाण्यात पवित्र स्नान करता येणार आहे. त्यामुळे भाविकांची आषाढी यात्रा आनंदी होण्यास मदत होणार आहे.

## सशस्त्र क्रांती कडून, निशस्त्र क्रांतीकडे नेणारी भीमा कोरेगाव ते पंढरपूर धम्मयात्रा : भंत्ते ज्ञानज्योती

सुराज्य/अकलूज



पंढरपूरचा पंढरीनाथ हा बुध्द आहे आणि ते मी सिध्द करुन दाखवतो असे डाँ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते.बाबासाहेबांची हिच चळवळ पुढे नेण्यासाठी आषाढी वारी दरम्यान भिमा कोरेगांव ते पंढरपुर १२ दिवसाची धम्मयात्रा गेल्या १० वर्षापासून सुरु आहे.सशस्त्र क्रांती कडून,निशस्त्र क्रांतीकडे निघालेल्या या धम्मयात्रामुळे जागरुकता होवुन भविष्यात वारकरी सांप्रदाय सुध्दा बुध्दाच्या शिकवणीचे अनुसरण केल्या शिवाय राहणार नाहीत, असे भत्ते ज्ञानज्योती यांनी सांगितले.

आषाढी वारी दरम्यान भत्ते ज्ञानज्योती व त्यांचा भिकुसंघ व बौध्द उपासकांचा सहभाग असलेली भिमा कोरेगांवहुन पंढरपूरकडे निघालेली धम्मयात्रा अकलूज येथे आल्यानंतर सारनाथ बुध्द विहाराच्या वतीने स्वागत करण्यात आले.सारनाथ बुध्द विहार येथे १धम्मयात्रा मुक्कामासाठी विसावल्यानंतर भत्ते ज्ञानज्योती यांचे प्रवचन झाले.

यावेळी उपस्थितांना बोधीत करताना पुढे ते म्हणाले,भिमा कोरेगावच्या सशस्त्र क्रांती कडून निशस्त्र क्रांतीकडे घेवुन जाणारी ही धम्मयात्रा आहे.

अकलूज येथे सारनाथ बुध्द विहारात धम्मयात्रेतील सहभागींना भोजनदान देण्यात आले.यावेळी मा.सरपंच विठ्ठल गायकवाड बौध्द महासभेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड,रिपाईचे प्रदेशउपाध्यक्ष किरण धाईंजे,जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले,तालुकाध्यक्ष मिलींद सरतापे नाशिक सोनवणे,प्रविण लोंढे,प्रविण साळवे,गणपत जाधव,कोळसे सर,संतोष पाटील आदी उपस्थित होते.

## स्वच्छतादूतांमुळे वारी 'हरित' सोबतच होतेय 'निर्मल'

सुराज्य/अकलूज

स्वच्छतेचा टिळा
लावुनिया भाळी
देतोया आरोळी
पंढरीला।

देहू आणि आळंदीतून अनुक्रमे संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर पालख्यांसमवेत लाखो वारकऱ्यांची वारी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान झाली आहे. पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील विविध गावांमधून जाणाऱ्या या वारकऱ्यांचे आणि पालख्यांचे स्वागत जल्लोषात होत आहे. ठिकठिकाणी या वारकऱ्यांचा चहा,नाश्ता,जेवण,मालिश अशा माध्यमातून सेवा देण्यात स्थानिक मंडळी हिरीरीने पुढाकार घेत आहेत.वेगवेगळ्या उपक्रमातून या दिंड्यांचा रोजचा मार्गक्रमण सुकर होत असला तरी या दिंड्यांसोबतच



वारी करणाऱ्या 'स्वच्छतादूतांमुळे उन्हात-पावसात वारकऱ्यांची वारी 'हरित' करण्यासोबतच 'निर्मल' करण्याचेही महत्त्वपूर्ण कार्य सुकर होत आहे.

पुणे जिल्हा परिषद स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पालखी सोहळ्यात सहभागी वारकऱ्यांसाठी स्वच्छतेची सुविधा देण्यासाठी विशेष फिरते शौचालय अथवा मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली आहे.यामुळे वारकऱ्यांच्या शौचालयाची अडचण दूर झाली असून या व्यवस्थेबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. ८ जूनपासून संत तुकाराम महाराज पालखींचे प्रस्थान देहूतून झाले.

संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर १००० मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली असून शेकडो स्वच्छता कर्मचारी या कामासाठी तैनात करण्यात आले आहेत.हे सर्व सफाई कर्मचारी वारीच्या मुक्कामाच्या ठिकाणी हजर असतात.तीन शिफ्टमध्ये हे कामगार स्वच्छतागृहे स्वच्छ करतात.सर्व शौचालयांमध्ये अखंड वीजपुरवठा असतो.जेथे वीजपुरवठा शक्य नाही,तेथे जनरेटरची सोय केली जाते. जेटिंग मशीनने सर्व शौचालयांची वेळेवर स्वच्छता करण्यात येते. सर्व शौचालये सेक्शन मशीनने वेळोवेळी रिकामी केली जातात. शौचालय वाहतूक,बांधकाम, पाणीपुरवठा,जेटिंग/स्वीपिंग,वीज,सांडपाणी सेक्शन अशी चोख व्यवस्था असल्यामुळे वारकऱ्यांना कुठलीच अडचण येत नाही.

पुणे जिल्हा परिषदेचे अधिकारी,प्रशासकीय अधिकारी,स्थानिक अधिकारी यांच्या उत्तम समन्वयामुळे तसेच या कामासाठी नेमलेल्या कंत्राटदारांच्या उत्कृष्ट व प्रभावी अंमलबजावणीमुळे हा पालखीचा 'जगन्नाथरुपी रथ' व्यवस्थित ओढला जात आहे.

### १०० ट्रकमधून फिरत्या शौचालयांची वाहतूक

संत तुकाराम पालखी मार्गावर साधारणपणे १००० फिरत्या शौचालयांची व्यवस्था केली आहे. चार बाय चार आकाराचे एक शौचालय असून एका ट्रकमध्ये १० शौचालये बसतात. त्यानुसार दररोज १०० ट्रकमधून ही वाहतूक सुरू असते. त्याबरोबरच मैला वाहतूक आणि पाण्याचे टँकर अशा १०० ट्रक आणि जेटिंगसाठीच्या २५ गाड्या असे एकूण २२५ ते २५० ट्रकची रोजची वाहतूक सुरु असते.

### महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात महिलावर्गही मोठ्या संख्येने सहभागी झालेला आहे. महिलांची कुचंबणा होऊ नये यासाठी त्यांना स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या शौचालयासाठी महिला कामगारांचीच व्यवस्था करण्यात आली असल्यामुळे महिला वारकरी निश्चिन्त झाल्याचे चित्र दिसते. याशिवाय महिला प्रसाधनगृह परिसरातही मास्किंग करण्यात येते.

## महत्त्वाचे वृत्त

### परीक्षा परिषदेकडून आता डिजिटल प्रमाणपत्रे

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या टीईटी, टायपिंग आदी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याची बनावट प्रमाणपत्रे तयार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आले आहेत. अशी बनावट प्रमाणपत्रे रोखण्यासाठी आता राज्य परीक्षा परिषदेकडून सर्व परीक्षांची प्रमाणपत्रे डिजिटल पद्धतीने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सर्व प्रमाणपत्रांमध्ये डिजिटल स्वाक्षरी आणि क्यूआर कोड वापरण्यात येणार आहे. डिजिटल प्रमाणपत्रांमुळे परीक्षा परिषदेची आर्थिक बचतही होणार आहे.

### बालकामगार अत्याचाराचे मुंबईत तिप्पट गुन्हे

**नागपूर :** लहान मुला-मुलींवरील लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये (पोक्सो) सातत्याने वाढ होत असून गेल्या पाच महिन्यांत मुंबईत पोक्सो संदर्भातील चक्क तिप्पट गुन्हे दाखल झाले. नागपूर आणि पुणे शहरात मात्र पोक्सो गुन्ह्यांवर नियंत्रण आहे. मुंबईत पाच महिन्यांत ३९० गुन्हे दाखल झाले आहेत तर पुणे (८७) आणि नागपूर (५२) गुन्हे दाखल आहेत, ही धक्कादायक माहिती महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावरून समोर आली आहे. राज्यात तरुणी आणि महिलांवर लैंगिक अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. तसेच अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्येसुद्धा सातत्याने वाढ होत आहे. या प्रकाराची राज्य महिला आयोगाने गांभीर्याने दखल घेतली आहे.

### महाआघाडीत मुख्यमंत्रीपदाचे १० दावेदार

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्री पदावरून रस्सीखेच पाहायला मिळत आहे. महाविकास आघाडीतील विविध नेत्यांचा उल्लेख भावी मुख्यमंत्री असा केला जात आहे. याबाबतचे बॅनर्स कार्यकर्त्यांकडून लावले जात आहेत. दरम्यान, उद्धव ठाकरे पुन्हा मुख्यमंत्री होऊ दे, यासाठी ठाकरे गटाने विठूरायाकडे साकडं घातलं आहे. महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रीपदावरून सुरू असलेल्या दावेदारींवरून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी खिल्ली उडवली आहे. महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्री पदाचे एकूण १० जण दावेदार आहेत. २०२४ पर्यंत यामध्ये आणखी दोन नेत्यांचा समावेश होईल, अशा शब्दांत चंद्रशेखर बावनकुळे यांनी खिल्ली उडवली आहे. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

### ‘ताडोबा’ पर्यटन १ जुलैपासून महागणार

**चंद्रपूर :** ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात बफर झोनमधील पर्यटन शुल्क वाढविण्याचा निर्णय ताडोबा व्यवस्थापनाने घेतला आहे. १ जुलैपासून किमान १ हजार रुपये वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे ताडोबात पर्यटन सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाणार आहे. ताडोबा प्रकल्प वाघ, बीबट, काळा बिबट्या, हरीण, चितळ, अस्वल, कोल्हा, नीलगाय यासोबतच इतर वन्य प्राण्यांच्या दर्शनाने पर्यटकांसाठी आकर्षनाचा केंद्रबिंदू ठरला आहे. दरवर्षी लाखो देशविदेशातील पर्यटक या प्रकल्पाला भेट देतात. मात्र आता पर्यटकांना आर्थिक झळ सोसावी लागणार आहे. कारण १ जुलैपासून पर्यटन शुल्कात वाढ करण्यात येणार आहे.

### १०७ गृहप्रकल्पांची नोंदणी रद्द होणार

**मुंबई :** राज्यभरातील १०७ महारेरा नोंदणीकृत गृहप्रकल्पांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय महारेराने घेतला आहे. या प्रकल्पांची यादी महारेराच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून त्यावर आक्षेप नोंदविण्यासाठी ७ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. जुन्या ८८ प्रकल्पांबाबत आक्षेप नोंदविण्यासाठी १७ जूनपर्यंत असलेली मुदत ७ जुलै अशी करण्यात आली आहे. नवीन १९ प्रकल्पांबाबत ७ जुलैपर्यंत आक्षेप नोंदविता येतील असे महारेराने जाहीर केले आहे. नवीन गृहप्रकल्पांना महारेरा नोंदणी बंधनकारक आहे. तर विहित मुदतीत प्रकल्प पूर्ण करणेही विकासकांसाठी बंधनकारक आहे. जे विकासक वेळेत प्रकल्प पूर्ण करत नाहीत किंवा नोंदणीची मुदत संपते त्या प्रकल्पाची नोंदणी रद्द करण्याची तरतूद रेरा कायद्यात आहे.

### अकोल्यात भाजपाची मशागत

**अकोला :** आगामी काळातील लोकसभा, विधानसभा व महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने राजकीय मशागत सुरू केली. पक्षाच्या महाजनसंपर्क अभियानातून विविध घटकांचे मेळावे घेण्यासह प्रत्यक्ष भेटीगाठी व चर्चा करण्यावर भर दिला जात आहे. देवेंद्र फडणवीसांच्या सभेच्या माध्यमातून भाजपने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. जिल्ह्यातील वर्चस्व कायम राखण्यासाठी पक्षातून आत्तापासून धडपड करण्यात येत असल्याचे चित्र आहे. पश्चिम विदर्भातील अकोला लोकसभा मतदारसंघ भाजपचा गड आहे. विभागात भाजपचे अकोल्यातून संजय धोत्रे एकमेव खासदार आहेत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्रिपदी वर्णी लागली होती.

### निकाल प्रलंबित असल्याने विद्यार्थी त्रस्त

**वर्धा :** एमपीएससी मार्फत पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षा २०२० मध्ये घेण्यात आल्या. मात्र त्याचा निकाल अद्याप लागला नाही. ६५० पदांसाठी हजोरो विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. मुलाखतीपण आटोपल्या. याच दरम्यान मराठा आरक्षण रद्द झाल्याने त्यांना इडब्लूएस म्हणजेच आर्थिक दुर्बल कोट्यातून आरक्षण देण्याचा निर्णय झाला. प्रकरण मॅटमध्ये गेले. तिथे मराठा आरक्षण अवैध असल्याचा निर्णय झाला. तिथून या विद्यार्थ्यांची परवड सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या मते प्रश्न केवळ आर्थिक दुर्बल घटक या पदांचा होता. इतर पदांचे निकाल जाहीर करून त्यात जे उत्तीर्ण झाले त्यांच्या नियुक्तीचे मार्ग मोकळे करणे आवश्यक होते. पण लोकसेवा आयोग व राज्य शासन यांच्या भूमिकेने आम्ही साडेतीन वर्षांपासून प्रतीक्षेत असल्याचे विद्यार्थी म्हणतात.

### ट्रॉलीखाली चिरडून चार महिलांचा मृत्यू

**वाई :** शेतातील कामे करून ट्रॅक्टर ट्रॉलीत बसून घरी परत जात असताना ट्रॅक्टर ट्रॉली अरुंद पुलावरून कॅनॉलमध्ये पडून चार महिलांचा मृत्यू झाला. सातारा शहरालगत कारंडवाडी येथे ही घटना घडली. यात उल्का भारत माने (वय ५५) अरुणा शंकर साळुंखे (५८) सीताबाई निवृत्ती साळुंखे (६५) लिलाबाई शिवाजी साळुंखे (६०) सर्व रहाणार कारंडवाडी ता. सातारा या जागीच ठार झाल्या. चारजणी जखमी झाल्या. यातील दोघींची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे.

### राज्यात विजेच्या मागणीत मोठी घट

**नागपूर :** राज्यभरात पावसाला सुरुवात झाल्याने तापमानात मोठी घट झाली आहे. त्यामुळे राज्यात विजेची मागणी २३ हजार २६५ मेगावॅटवर आली आहे. मुंबईतही विजेच्या मागणीत घट झाली असून शनिवारी राज्यात या वर्षातील निच्चांकी विजेची मागणी नोंदवली गेली.

राज्याच्या बऱ्याच भागात मे आणि जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात उन्ह-पावसाचा खेळ सुरू होता. त्यामुळे विजेच्या मागणीत चांगलाच चढ-उतार पहायला मिळाला. परंतु गेल्या दोन दिवसांपासून राज्याच्या बऱ्याच भागात पावसाला सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांकडून कृषिपंपांचा आणि सर्वसामान्य ग्राहकांकडून विजेचा वापर कमी झाल्यामुळे २४ जून २३ रोजी दु. ५ वाजता विजेची मागणी केवळ २३ हजार २६५ मेगावॅट नोंदवली गेली. त्यापैकी ३ हजार ३ मेगावॅट मागणी ही मुंबईची होती.

# १ कोटीच्या खंडणीसाठी त्रास

## शिंदेंनी कुटुंबासह केला भयावह शेवट

सुराज्य/कोल्हापूर

**औद्योगिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठं नाव कमावलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहरातील प्रख्यात उद्योगपती अर्जुन समुहाचे प्रमुख संतोष शिंदे यांनी पत्नी आणि मुलासह भयावह पद्धतीने आत्महत्या केल्यानंतर खळबळ उडाली आहे. दरम्यान खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा झालेला प्रयत्न, त्यानंतर माजी नगरसेविका आणि पोलीस अधिकारी राहुल राऊतने एक कोटीच्या खंडणीसाठी केलेला मानसिक छळ यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलताना कुटुंबाचा अंत केला आहे. शिंदे यांनी आत्महत्या करण्यापूर्वी सुसाईड नोट लिहून ठेवली आहे.**



या सुसाईड नोटची माहिती मिळताच गडहिंग्लजमध्ये नागरिकांनी कडकडीत बंद पाळला. तसेच जोवर सुसाईड नोटमध्ये नावे असणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल होत नाही, तोवर मृतदेहांना हात लावणार नाही, अशी भूमिका घेतली. अखेर पोलिसांनी समज काढून गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन केल्यानंतर नंतर सोपस्कार पार पाडण्यात आले.

दरम्यान, संतोष शिंदे यांनी ज्या पद्धतीने आयुष्याचा शेवट केला ते पाहून अक्षरशः काळजाचा थरकाप उडाला आहे. त्यांनी आपल्या बेडरूममध्ये आत्महत्या करताना विषप्राशन केले आणि गळ्यावर सुरी ओढून घेतली. त्यामुळे बेडरूममध्ये रक्ताचा सडा पसरला होता, इतकेच नव्हे तर भिंतींवरही रक्ताचे डाग पसरले गेले होते. बेडरूममधे सर्वत्र रक्ताचे डाग आणि फरशीवर रक्ताचे पाट वाहिल्यासारखी परिस्थिती होती. त्यामुळे मुलाने अशा पद्धतीने शेवट केल्याने त्यांच्या आईला प्रचंड मानसिक धक्का बसला असून त्यांना दवाखान्यामध्ये दाखल करावं लागलं आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार संतोष यांच्यावर महिनाभरापूर्वी कर्नाटकमध्ये बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. यामध्ये त्यांना अटक होऊन वीस ते पंचवीस दिवस कारागृहात काढावी लागलीय. त्यामुळे त्यांना मोठी निराशा आली होती. याचा परिणाम व्यवसायावर सुद्धा झाला होता.

जामिनावर बाहेर आल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा उद्योग सुरू करण्यासाठी लक्ष दिले. मात्र, निराशा त्यांची पाठ सोडत नव्हती. बलात्काराच्या खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवल्याने त्यांची मानसिक स्थिती ठीक नव्हती.

### माजी नगरसेविका आणि पोलीस अधिकाऱ्याच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

शिंदे यांनी सुसाईड नोट लिहिली असून यामध्ये आत्महत्येसाठी चौघांना दोषी धरावे असे म्हटले आहे. एक कोटीच्या खंडणीसाठी त्रास देणारी माजी नगरसेविका, पोलीस अधिकारी राहुल राऊत तसेच संतोष शिंदे यांच्याकडून साडेसहा कोटी रुपये घेतलेले पुण्यातील विशाल बाणेकर आणि संकेत पाटे यांच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे. संतोष शिंदे यांनी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये सुद्धा त्या चौघांची नावे असून आणि माझ्या आत्महत्येला त्यांनाच जबाबदार धरण्यात यावे, असे म्हटले आहे. या संदर्भातील फिर्याद संतोष यांचे नातेवाईक शुभम बाबर यांनी दिली आहे.


# संपूर्ण महाराष्ट्र मान्सूनने व्यापला

### भारतीय हवामान विभागाची घोषणा

सुराज्य/मुंबई

सर्वांसाठी एक आनंदाची बातमी आहे. मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला आहे. भारतीय हवामान विभागानं याबाबतची घोषणा केली आहे. गुजरात, राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि जम्मू काश्मिरचा काही भाग सोडता संपूर्ण देशात मान्सून सक्रिय झाल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार संपूर्ण महाराष्ट्र मान्सूनने व्यापला आहे. गुजरात, राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि जम्मू काश्मिरात पुढील दोन दिवसात मान्सून सक्रिय होण्यासाठी अनुकूल वातावरण असल्याची माहिती देखील हवामान विभागानं दिली आहे. सध्या राज्याच्या काही भागात पाऊस कोसळत आहे. अद्याप काही ठिकाणी



पपावसाची प्रतिक्षा कायम आहे.

**मुंबईसह दिल्लीतही मान्सून दाखल**

मुंबई आणि दिल्लीत मान्सून सक्रिय झाल्याची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाकडून करण्यात आली आहे. मुंबईत ११ जून रोजी मान्सून दाखल होण्याची तारीख आहे. तर दिल्लीत २७ जून रोजी मान्सून दाखल होत असतो. मात्र, यावर्षी मुंबईत १४ दिवस उशिराने मान्सून दाखल झाला आहे तर दिल्लीत दोन दिवस आधीच मान्सूनचे आगमन झाले आहे. परवापासूनच मुंबईत पावसाला सुरुवात झाली आहे. मुंबईच्या विविध भागात चांगला पाऊस कोसळत आहे. त्यामुळे हवामान विभाग मुंबईत मान्सून दाखल झाल्याची घोषणा कधी करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर हवामान विभागाने मुंबईसह दिल्लीत मान्सून दाखल झाल्याची घोषणा केली आहे.

राज्याच्या विविध भागात पावसाने हजेरी लावली आहे. कुठं हलका ते मध्यम स्वरुपाचा तर कुठे जोरदार पाऊस कोसळत आहे. मुंबईत शनिवारपासून पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे. अनेक ठिकाणी पहिल्याच पावसाच मुंबईची तुंबई झाल्याचं पाहायला मिळालं. त्याचबरोबर राज्यातील वाशिम, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, पालघर, वसई विरार, कोल्हापूर या भागात पावसानं जोरदार हजेरी लावली. तर काही ठिकाणी नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याचे पाहायला मिळाले.

# काश्मिरमधून बेपत्ता झालेली महिला दापोलीत सापडली

सुराज्य/दापोली



जम्मू काश्मीरमधील कुपवाडा येथील बेपत्ता झालेली महिला रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे सापडली आहे. कुपवाडा येथून आलेल्या पोलिसांनी संबंधित महिला आणि तिच्याबरोबर असलेल्या अब्दुल कादीर खान या व्यक्तीला दापोलीतील एका लॉजमधून ताब्यात घेतले आहे.

आपली पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार कुपवाडा पोलीस स्थानकात एका व्यक्तीने काही दिवसांपूर्वी दिली. त्यानंतर कुपवाडा पोलीस स्थानकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रियाज अहमद यांच्या नेतृत्वाखाली तेथील पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली असता अब्दुल कादीर खान याचा महाराष्ट्र आणि राजस्थान या राज्यांमध्ये संपर्क असल्याची माहिती पोलिसाना मिळाली. त्याआधारे त्यांनी सापळा रचला. ते यापूर्वीदेखील एकदा दापोली येथे येऊन गेले होते, पण खान याचा शोध लागला नव्हता.

दरम्यान, तो दापोलीतच असल्याची माहिती पुन्हा एकदा मिळाल्याने ते बेपत्ता महिलेच्या पतीसह दापोलीमध्ये आले. येथील काही लॉजमध्ये कसून शोध घेतला असता अखेर अब्दुल कादीर खानला संबंधित महिलेसह पकडण्यात पोलिसांना यश आले. यावेळी त्या महिलेचा पतीही सोबत असल्याने ओळख पटवणे सहज शक्य झाले.

## वनविभागाचा प्रताप

### बिबट्याला खाऊ घातल्या चपात्या

**सुराज्य/अहमदनगर :** वनविभागाने काही दिवसांपूर्वी कोपरगांव येथून पकडलेल्या बिबट्याची उपासमार सुरू असून बिबट्याला चक्क चपात्या खावू घातल्या असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वास्तविक जंगली श्वापद, हिंस्त्र प्राणी यांच्यापासून माणसांना काही धोका होऊ नये, माणसांपासून या प्राण्यांना काही इजा होऊ नये यासाठी वनविभागाकडे जबाबदारी असते. त्यासाठी वनविभाग प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची अशा कामासाठी नियुक्ती करत असतो.

या कमर्चाऱ्यांकडे पकडलेल्या जनावरांची काळजी घेण्याची जबाबदारी असते. मात्र, अहमदनगर जिल्ह्यातील लोणी गावात वनविभागाच्या कार्यालय परिसरात आणून ठेवलेल्या बिबट्याकडे वनविभगाच्या कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे पकडलेल्या बिबट्याची उपासमार झाली. त्यामुळे बिबट्या अधिकच चवताळला आहे. वास्तविक पकडलेल्या जंगली प्राण्यांना मांस खावू घालण्यासाठी निधीची तरतूदही केलेली असते.

### पंकजा मुंडेंना बीआरएसकडून मुख्यमंत्रीपदाची साद

**सुराज्य/बीड :** भारत राष्ट्र समिती पक्ष मोठ्या ताकदीने पुढे येत आहे. अनेक नवीन चेहरे पक्षात दाखल होत असून, पंकजा मुंडे यांच्यासारख्या सक्षम नेतृत्वाने प्रवेश केल्यास मुख्यमंत्री चंद्रशेखर राव नक्कीच त्यांना न्याय देतील, असे स्पष्ट करत भारत राष्ट्र समितीचे बाळासाहेब सानप यांनी पंकजा मुंडेंना मुख्यमंत्रिपदासह साद घातली आहे. तर इकडे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पंकजा कोठेही जाणार नाहीत, त्यांच्या रक्तात भाजप आहे, असे स्पष्ट केले.

# जयंत पाटील राष्ट्रवादी सोडणार

### भाजपाने व्हिडिओ शेअर करत सांगितली कारणे

सुराज्य/मुंबई

अजित पवारांना प्रदेशाध्यक्ष करावे, अशी मागणी समर्थकांकडून वाढत आहे. असे असतानाच भाजपाने जयंत पाटलांचा व्हिडिओ ट्वीट केला आहे.

जयंत पाटील राष्ट्रवादी सोडणार असल्याचा दावा भाजपाने केला आहे. अलीकडील काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील नाराज असल्याचा चर्चांना उधाण आलं आहे. जयंत पाटील भाजपाच्या वाटेवर आहेत. लवकरच ते मार्गक्रमक करतील,’ असं विधान शिवसेना (शिंदे गट) आमदार संजय शिरसाट यांनी केलं होतं. अशातच भाजपाने मोठा दावा केला आहे. जयंत पाटील राष्ट्रवादी सोडणार असून, त्याची १० कारणेही भाजपाने सांगितली आहेत.

भाजपाने एक व्हिडिओ ट्वीट केला आहे. या व्हिडिओत म्हटलं की, शरद पवारांनी निवृत्ती नाट्य रंगवलं होतं. त्यात शरद पवार यांच्याव्यतिरिक्त जयंत पाटील यांनी चांगलं



नाट्य केलं. किती रडले होते ते आता जाणवतं ते अश्रू खरे होते, पण कारण वेगळं होतं. म्हणूनच जयंत पाटील बाहेर पडणार, अशी कुजबूज सुरू झाली आहे. त्यामुळे जयंत पाटील यांच्याकडं पक्षातून बाहेर पडण्यासाठी एक नाहीतर दहा कारणे आहेत.



## लावणी सम्राज्ञीला मिळाला निवारा

**सुराज्य/अहमदनगर :** कोपरगाव येथील एकेकाळची लावणीसम्राज्ञी शांताबाई कोपरगावकर ह्या वृद्धावस्थेत हलाखीचे जीवन जगत असल्याबाबतची बातमी एका खाजगी वृत्तवाहिनीने ऑनलाइनने दाखवली होती. यानंतर लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यासह विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेत थेट कोपरगाव येथील शांताबाईंच्या भाच्याच्या घरी जात त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. त्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. तसेच कोपरगावच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी शिर्डी येथील वृद्धाश्रमात त्यांना तात्पुरता निवारा उपलब्ध करून दिला.

# टीम इंडियाचा हुकमी एक्का वर्ल्डकप खेळणे अवघड

सुराज्य/मुंबई

भारतीय क्रिकेट संघासाठी एक वाईट बातमी आहे. दुखापतग्रस्त खेळाडू पुनरागमनासाठी झगडत आहेत. भारताचे ४ मुख्य खेळाडू बऱ्याच काळापासून संघाबाहेर आहेत. ज्याचा फटका टीम इंडियाला वेळोवेळी बस्तान दिसत आहे. भारतात यंदा होणार विहस्वचषक भारताला जिकून त्यांना आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ नक्कीच संपवायचा आहे. त्यामुळे त्यांच्या दमदार खेळाडू लवकरात लवकर संघात परतणं महत्त्वाचं आहे. पण आता आगामी एकदिवसीय विश्वचषकासाठी टीम इंडियासाठी खूपच धक्कादायक बातमी समोर आली आहे.

एकदिवसीय विश्वचषक वर्षात टीम इंडियासाठी हा मोठा धक्का आहे. मधल्या फळीतील प्रमुख फलंदाज श्रेयस अय्यर अद्याप दुखापतीतून सावरला नसल्यामुळे आशिया चषक स्पर्धेतील त्याची उपस्थितीही संशयास्पद असल्याचे वृत्त आहे. सूत्रांनी सांगितले की, अय्यर ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आशिया चषकापर्यंत तंदुरुस्त होऊ शकणार नाही.

एप्रिलमध्ये श्रेयस अय्यरवर शस्त्रक्रिया झाली, त्यानंतर तो जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये खेळू शकला नाही आणि आता जुलै-ऑगस्टमध्ये होणाऱ्या वेस्ट इंडिज दौऱ्यासाठीही त्याची निवड झालेली नाही.

## साडेतीनशे पेक्षा जास्त उद्योजिका आत्मनिर्भरतेच्या वाटेवर...

# मुख्यमंत्री रोजगार योजनेचे बळ

सुराज्य/मुंबई

सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करताना बँकेचे कर्ज, शासन स्तरावर अनुदान प्रदान करीत उद्योग सुरू करण्यासाठी पाठबळ देण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने मुख्यमंत्री रोजगार योजना कार्यान्वीत केलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील ३५१ उद्योजिका आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत आहेत.

नाशिक जिल्ह्यात या योजनेचा लाभ घेत उद्योजकतेची वाट धरलेल्यांमध्ये महिलांचे प्रमाण मोठे आहे. बेरोजगारीच्या समस्येवर मात करीत महिलांना उद्योग उभारणीसाठी ही योजना प्रभावी ठरत आहे. या योजनेच्या माध्यमातून ५० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज लाभार्थींना उपलब्ध करून दिले जाते. गेल्या वर्षभरात जिल्ह्यातील ३५१ उद्योजिकांनी या योजनेचा लाभ घेताना आत्मनिर्भरतेकडे पावले टाकली आहेत. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये योजनेच्या लाभासाठी एकूण ५६३ अर्ज दाखल झाले होते. त्यात ३५१ महिला उद्योजिकांचा समावेश आहे. शहर व ग्रामीण भागासाठी



उद्योग संचालनालयामार्फत जिल्हानिहाय कर्जपुरवठा व अनुदान वितरित केले जाते.

**जिल्हा उद्योग केंद्रातून**

### शैक्षणिक पात्रतेनुसार कर्ज वितरण

या योजनेंतर्गत लाभार्थींच्या शैक्षणिक पात्रतेनुसार कर्जमर्यादा निश्चित केलेली आहे. त्यानुसार सातवी उत्तीर्णसाठी कमाल २५ लाख, दहावी उत्तीर्णसाठी कमाल ५० लाखांपर्यंत कर्ज मंजूर होते. याशिवाय राखीव प्रवर्गातील आणि ग्रामीण भागातील लाभार्थींना त्यांच्या निकषांनुसार अनुदान दिले जाते. योजनेच्या लाभासाठी अर्जदार व्यक्ती १८ ते ४५ वर्षे वयोगटातील असावी. राखीव प्रवर्गाकरिता वयासाठी पाच वर्षांची अतिरिक्त सवलत लागू आहे. संबंधितांचे स्थायी उत्पन्न नसायला हवे.

**निश्चिती**

या योजनेची अंमलबजावणी जिल्हा उद्योग केंद्रामार्फत केली जात आहे. जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहतात. आठ सदस्यांच्या समितीतर्फे लाभार्थींबाबत निर्णय घेतला जातो. समितीमध्ये बँकांचे प्रतिनिधी, उद्योग संघटना पदाधिकाऱ्यांना संधी दिलेली असते.



पावनं ऽऽ रामराम

## काय म्हणतयं? पॉलिटिक्स

राजकारणातील मंडळी इतकी पक्की की विचारायला सोय नाही. इकडेचे तिकडे करण्यात त्यांचा हातखंडा. सर्वसामान्य जनतेला नादी लावणे हा त्यांचा जणू मक्ताच. त्यात त्यांचे कार्यकर्तेही तसेच. 'ना फायदा, ना तोटा' या तत्वावर कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांना निव्वळ चंगळवाद मिळाला की संपले. यामुळे राजकारण्याचे फावत आहे. निवडणुकीत आता मला बस्स..., माझ्या या सच्च्या कार्यकर्त्याला तिकीट द्या, मी निवडणून आणतो, असे कुणी कधी म्हटलेले ऐकवित देखील नाही. आपण नाही आपली पोरं-बाळं किंवा सगेसोयरे यांच्या पलिकडे त्यांना एखादा कार्यकर्ता आपल्या बळावर मोठा व्हावा, असे त्यांना कधी वाटतच नाही. आपल्या पक्षाचा विस्तार करणे आणि स्वत:चे स्तोम माजविणे, हा त्यांचा एकमेव धंदा. आता बघा, कुठे तेलगंणा.. आपल्या शेजारचे अलिकडेच अस्तित्वात आलेले नवे राज्य. बीआरएसचे के चंद्रशेखरराव यांनी व त्यांच्या पक्षाने तेलगंणावर कब्जा केलेला. केवळ या जोरावर त्यांना महाराष्ट्रात पक्ष कमी होते काय म्हणून आपले पसारा पसरायला सुरुवात केली आहे. त्यांचा एक भाग म्हणून आषाढी वारीनिमित्त पंढरपूरचा पांडुरंग त्यांना आठवला. याचा राजकीय फायदा उठविण्यासाठी त्यांची दीडशेजणांचा ताफाच

# राजकारण्यांचा 'तिसरा डोळा'



पंढरपूरला आणण्याचा विडा उचलला आहे. दुसरीकडे बीआरएसच्या गंगेत स्वत:चे अस्तित्व टिकविण्यासाठी भगीरथ भालके यांनी आपले घोडो धामटले आहे. तिसरीकडे काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे यांनी साखर कारखान्या चिमणी अधिकृत की अनधिकृत हेच मला माहिती नाही, असे सांगून चिमणीप्रकरणापासून ते अलविदा झाले आहेत. तरी इकडे सत्ता आणि भावाच्या मंत्रीपदाच्या जोरावर प्रा. शिवाजी सावंत यांनी जिल्हा ढवळून काढत शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची तयारी सुरु आहे. यावरुन आपापल्या सोयीचे राजकारण करण्यात ही मंडळी किती मश्गुल झाली आहेत, हेच स्पष्ट होत आहे. म्हणूनच आम्ही म्हणतोयं, यांना सर्वसामान्यांची पर्वाच नाही. माणसाला आणि पशुप्राण्यांना दोनच डोळे आहेत. राजकारण्यांना मात्र कधी दिसत नसला तरी 'तिसरा डोळा' आहे असे म्हटले जाते. ते कधी कशाच शोध लावतील, कुठला विषय कुठे नेवून ठेवतील, राजकीय फायद्यासाठी आपला 'तिसरा डोळा' उघडून कुणावर वठारतील, याचा काही





शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो. ९५१८७७३०४८

### ... दुसरा पर्याय काय?

पंढरपूरचेच भगीरथ भालके हे सगळ काही गमावून बसल्यानंतर त्यांनी अस्तित्व टिकविण्यासाठी बीआरएसचा आसरा घेण्याचा इरादा पक्का केला आहे. स्व. आ. भारतनानाच्या निधनानंतर सहानुभतीने विधानसभेच्या पोटनिवडणुकीत एक लाखाच्या वर त्यांना मते मिळाली. पण पराभव पत्करावा लागला. नंतर हाताशी असलेला एकमेव कारखाना गेला. अभिजित पाटीलांनी दणका दिल्याने ते स्वत:हूनच राष्ट्रवादी काँग्रेसपासून दूर गेले. आणि आता बाहेरुन महाराष्ट्रात आलेला बीआरएस या नवख्या पक्षात ते जात आहे. कुणी कुठल्याही क्षेत्रात जावे आणि काय करावे हा ज्याचा त्यांचा प्रश्न आहे. पण नंतर पश्चाताप होऊन 'विनाशकाली विपरित बुध्दी' असे ठरु नये, म्हणजे झाले. पण पुढे भालकेंच्या उघडलेल्या या तिसऱ्या डोळ्याला त्यांच्याची समर्थकांनी चांगली साथ दिली तर बरेच काही साध्य होईल.

### चिमणीचं कवित्व ... नवलच की हो...!

सिध्देश्वर साखर कारखान्याच्या चिमणी पाडकामचं कवित्व अजूनही सुरुच आहे. अनेक राजकारणी यानिमित्ताने कारखान्याचे मार्गदर्शन संचालक धर्मराज काडादी यांना भेटून त्यांने सात्वंन करुन सहानुभती मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परवाच केंद्रीय माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही काडादींच्या गंगा निवासस्थानी जाऊन त्यांचे सात्वंन केले. ही चिमणी अधिकृत होती की अनधिकृत हे मला माहिती नाही. ती अनधिकृत असल्याचे समजले असते तर मी सत्तेस असताना नियमित करण्याचा प्रयत्न केला असता तसं काडादींनीही प्रयत्न केला आहे, असे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. आता काय करावे... सोलापूरच्या राजकारणी सुपूत्राला चिमणी अधिकृत की अनधिकृत आहे, हे माहिती नसावे, ते नवलच नाही का? पण शिंदेसाहेब, असे का बोलले?, हा प्रश्न आहे. खरंच त्यांना चिमणीचं प्रकरण माहिती नाही?. पण हे सगळं जाऊ द्या हो, चिमणीवरुन त्यांनी उघडलेला 'तिसरा डोळा' कुणाचा फायदा आणि कुणाचा तोटा करणार, हे काळच ठरवेल.

### वारीच्या गंगेत राजकीय घोडे

तेलंगणाचे मुख्यमंत्री आणि बीआरएसचे सर्वेसर्वा के चंद्रशेखर राव यांनी उदंड अशी राजकीय अभिलाषा बाळगून महाराष्ट्रात आपल्या पक्षाचा विस्तार करण्याचा विडा उचलला आहे. नांदेड, औरंगाबाद, नागपूर, सोलापूर, पुणे या जिल्ह्यात त्यांनी आपला पाय पसरायला सुरु केले आहे. सोलापूर जिल्ह्याला तसे धार्मिक अधिष्ठान. पंढरपूर म्हणजे दक्षिणेचे काशी अणि तेथील सावळा विठ्ठल. हा विठुराया बीआरएसचे के. चंद्रशेखर राव यांना त्यांच्या उभ्या हयातीत कधी आठवला नसेल. पण आता केवळ राजकीय फायदा उठवण्यिासाठी आणि आपल्या पक्षावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी त्यांनी पंढरीचा पांडुरंग निवडला. त्यात आषाढी असल्याने त्यांनी यानिमित्ताने दीडशेजणांचा ताफा घेऊन पंढरीच्या विठुरायाचरणी माथा टेकविण्याची आस बाळगली आहे. खरंतर ही त्यांची भक्ती आहे की, पांडुरंगाच्या नावाखाली शक्ती दाखविण्याची युक्ती आहे?, हाच खरा प्रश्न आहे. पण वारीत गंगेत राजकीय घोडे धापटण्याची त्यांनी कल्पना मात्र अफलातून आहे. चंद्रशेखर राव यांनी 'तिसरा डोळा' उघडालाय, ते केवळ आणि केवळ राजकीय फायद्यासाठीचऋ

### शिवाजी सावंतांची खेळी...

आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू आणि शिवसेना शिंदे गटाचे संपर्क प्रमुख प्रा. शिवाजी सावंत हे तसे राजकारणात डावपेच आखण्यात पारंगत. तसे तानाजी सावंतांचे पडद्यामागचे पक्षीय राजकारणाची सूत्रे शिवाजी सावंताकडेच. त्यामुळे भावाच्या सत्तेच्या जोरावर आणि पक्षातील आपल्या पदाच्या जोरावर अनेकांना त्यांनी आपल्या गटात ओढले आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत तानाजी सावंत यांचा शिवसेना तिकीट वाटपात सोलापूर जिल्ह्यात तसा हस्तक्षेप झाला अगदी तसाच हस्तक्षेप याखेपेस जिल्ह्यात होणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये झाल्याशिवाय राहणार नाही, हे मात्र निश्चित. दस्तरखुद्द ते स्वत:च सोलापूर शहर मध्यमधून निवडणूक लढविण्याची तयार करीत आहेत. त्यामुळे आतापासूनच शिंदे गटात अस्वस्थता पसरली आहे. पण काही

# काँग्रेसमधील वर्चस्वासाठी 'हॉट वॉर'!

**सचिन अपसिंगकर**



कर्नाटकातील विजयानंतर मरगळलेल्या काँग्रेस जनांमध्ये आता उत्साहाचे वारे संचारले असून, नुकत्याच पाटणामध्ये झालेल्या भाजपा विरोधक पक्षांच्या एकत्रीकरण बैठकीनंतरही भाजपा विरूद्ध सूर लावला जात आहे. बार्शीमध्ये काँग्रेस पक्ष कात टाकत असून मूठभर कार्यकर्ते असले तरी त्यांच्यामधली गटबाजीमात्र संपत नाही. विजय साळुंखे यांच्या शहराध्यक्ष निवडीमुळे आरगडे गट अस्वस्थ आहे. सध्या आरगडे व साळुंखे काँग्रेसवरील वर्चस्वसाठी पडद्या आड शह-काटशहाचे राजकारण करत आहेत.

बार्शीत काँग्रेसला २००६ ते २००९ या काळात राजेंद्र राऊत यांच्या रूपाने प्रभावी नेतृत्व मिळाले होते. त्यानंतर ॲड. शिवाजीराव क्षीरसागर, प्रमोद चांगभले यांनी काँग्रेस जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. २०१४ साली झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मात्र तत्कालीन काँग्रेस उमेदवार सुधीर गाढवे यांनी काँग्रेसचे पितळ उघडे पाडले. त्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची पुरती नामुष्की गाढवेंच्या उमेदवारीमुळे झाली. नंतर काँग्रेसमध्ये बार्शी परिवर्तन महाआघाडीच्या माध्यमातून सक्रिय झालेल्या आरगडे यांचे नेतृत्व पुढे आले. आरगडे हे ग्रामीण भागातून शहरात सक्रिय झालेले नेतृत्व होते. प्रस्थापितांच्या गळेकापू स्पर्धेमध्ये आपले स्थान निर्माण करायचे असेल तर सर्वमार्ग, व्यूहरचना आणि पवित्रे वापरली पाहिजेत यावर ठाम विश्वास असलेल्या आरगडे यांनी बार्शी शहराच्या समाजजीवनात सोशल मीडियातून खळबळ उडवून दिली. त्यांनी काँग्रेसचे संघटन वाढविण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम घेतले. आरगडे यांनी राज्य आणि राष्टीय पातळीवरील काँग्रेस नेत्यांशी संपर्क वाढविला, त्यांचे कार्य ठळकपणे जाणवू लागले.

आरगडे यांनी पक्षकार्य करताना प्रस्थापितांची मोठी नाराजी ओढवून घेतली. त्यानंतर आरगडे यांनी मोठ्या वादळाला तोंड दिले. आरगडे त्या वादळातून लवकर बाहेर पडू शकले नाहीत. त्या प्रसंगानंतर आरगडे यांना काँग्रेसच्या शहर अध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा लागला. काँग्रेसच्या शहराध्यक्ष पदाची धुरा विजय साळुंखे यांच्याकडे आली. साळुंखे यांनी काँग्रेसचे काम गेली अनेक वर्ष निष्ठेने केले आहे. साळुंखे हे समंजस, शांत, आणि परिपक्व विचारांचे आहेत. सर्व समावेशक वृत्तीच्या साळुंखे यांचा मोठा लोकसंग्रह आहे तसेच साळुंखे यांचा आरोप-प्रत्यारोपांचा वादग्रस्त राजकारणाकडे कल नाही. त्यामुळे अजातशत्रू साळुंखेंना काँग्रेसच्या जिल्हा व राज्य पातळीवरील नेत्यांनी पाठबळ दिले. मात्र काँग्रेसमध्ये आरगडे यांचेही समर्थक मोठ्या प्रमाणात आहेत. नुकत्याच झालेल्या एका कथित खंडणी प्रकरणाच्या निमित्ताने काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जुगलकिशोर तिवाडी यांना त्यांचे पट्टशिष्य असलेल्या आरगडेंनी गुरूदक्षिणा दिली आहे. आरगडे यांच्या या शरसंधानामुळे सध्या तिवाडी, साळुंखेंसह काँग्रेसजणांना देशभरात पर्यटन करण्याची वेळ आली आहे. आता काँग्रेसमधील कोल्डवॉरचे रूपांतर हॉटवॉरमध्ये झाले आहे.

**काँग्रेसला संघटनात्मक ताकदीची गरज**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये बार्शीत महाविकास आघाडीचा फॉर्म्युला आकाराला येण्याची शक्यता आहे. त्यामध्ये काँग्रेसचे स्थान वाढविण्यासाठी संघटनात्मक ताकदीची गरज आहे. भविष्यात काँग्रेसची सूत्रे अरगडे की साळुंखे? यांच्या ताब्यात राहणार याबाबत काँग्रेस समर्थकांमध्ये उत्सुकता आहे.

# लोहा गरम है, मार दो हातोडा...

## चिमणी पडली; राजकीय धूर मात्र अद्यापही कायमच

**अजित उंब्रजकर**

**कुमठे येथील श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडून दहा दिवसांचा काळ उलटून गेला आहे. आता या चिमणीच्या नावाखाली सोलापूर शहरात राजकारण सुरू आहे. भाजप विरोधक एकत्र आले असून दोन्ही देशमुखांवर टीका होत आहे. आगामी काळात या चिमणीचा फटका भाजपला बसेल, असे विरोधक म्हणत आहेत. त्यामुळे राजकीय वातावरण चिघळले आहे. भाजपला याचा फटका बसणार काय? याचे उत्तर येणारा काळच देणार आहे. मात्र सध्या तरी चिमणी पडली तरी राजकीय धूर मात्र अद्यापही निघत आहे.**

सिद्धेश्वर साखर कारखान्याची बेकायदेशीर चिमणी अखेर सात वर्षांनी पाडण्यात आली. संस्थापक संचालक धर्मराज काडादी यांनी चिमणी वाचवण्यासाठी मंत्रालय स्तरापर्यंत प्रयत्न केले. मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. शेवटी महापालिकेने ही चिमणी पाडली आणि त्यानंतरच खऱ्या अर्थाने राजकारणाला सुरुवात झाली. वास्तविक पाहता चिमणी पडण्यापूर्वी धर्मराज काडादी आणि माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्यात कलगीतुरा रंगला होता. त्या वेळेपासूनच धर्मराज काडादी आणि विरोधकांनी शहर आणि जिल्ह्यात भाजप विरोधात भूमिका घेतली होती. चिमणी पडल्यानंतर ही भूमिका आणखीन तीव्र झाली. चिमणी पाडण्यात भाजपचा आणि खास करून शहरातील आमदार विजयकुमार देशमुख आणि सुभाष देशमुख यांचाच हात होता, असे धर्मराज काडादी यांनी अप्रत्यक्षरित्या सांगितले.

चिमणी पाडल्यानंतर शहरातील सर्वच विरोधकांनी म्हणजे आमदार प्रणिती शिंदे, आडम मास्तर, विश्वनाथ चाकोते यांच्यापासून शहरातील अनेक माजी नगरसेवकांनी काडादी यांच्या सोबत जाण्याची भूमिका घेतली. इतकेच नव्हे तर माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही काडादी यांची भेट घेऊन त्यांना समर्थन दिले. वास्तविक पाहता या सर्व नेत्यांना आगामी कोणत्या ना कोणत्या निवडणुकीत भाजपच्या विरोधातच लढायचे आहे त्यामुळे या सर्वांना एक आयता मुद्दा मिळाला आहे. वास्तविक पाहता अडीच वर्षांपूर्वी राज्यात महाआघाडीचे सरकार होते. त्यावेळीही काडादी एकटेच मुंबई आणि मंत्रालयाच्या चकरा मारत होते. त्यावेळी कोणीही यात इंटरेस्ट दाखवला नाही. आता गरम तवा आहे, विरोधक पोळी भाजून घेत आहेत , असे राजकीय जाणकार बोलत आहेत. आमदार प्रणिती शिंदे यांनी तर भाजपला विमानसेवा चालू करूनच दाखववी असे चॅलेंज दिले.

यावरून आमदार विजयकुमार देशमुख समर्थक आणि आमदार प्रणिती शिंदे समर्थक यांच्यात ओ ताई- ओ मालक अशा पद्धतीने डिजिटल वार सुरू झाला. एका आमदाराने विमानसेवा सुरू करावी असे असे आव्हान देणे म्हणजे विकासाला विरोध करणे अशी टीका प्रणिती शिंदे यांच्यावर होत आहे. सुशीलकुमार शिंदे यांनी तर मला हे प्रकरण माहिती असते तर चिमणी नियमित केली असती असे आश्चर्यकारक विधान केले.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सत्ता आल्यावर चिमणी बांधून देऊ, असे सांगत कहरच केला. वास्तविक पाहता चिमणीच्या आडून सर्व राजकारण होत आहे. ही चिमणी परवानगी न घेता बेकायदेशीर बांधली होती हे विरोधक मान्य करायला तयार नाहीत. केवळ लोहा गरम है मार दो हातोडा याप्रमाणे सर्व विरोधक चिमणीच्या आडून राजकारण करत आहेत. भाजप मात्र न्यायालयचा तो निकाल आहे यावर काही बोलणार नाही असे म्हणत आहे. एकंदरीत धर्मराज काडादी आणि विरोधकांचा सूर पाहता चिमणीचा राजकीय धूर आणखी काही महिने दिवसात राहणार असेच चित्र सध्या सोलापुरात निर्माण झाले आहे.

### हवामानाप्रमाणे राजकारण बदलले तर

सध्याचे राजकारण हवामानाप्रमाणे झाले आहे. आताचे जे विरोधक आहेत, ते उद्या एकत्र येण्याची शक्यता आहे तर आताचे मित्र उद्या उघड शत्रू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यावेळेस मात्र या सर्व विरोधकांची भूमिका पाहण्यासारखी राहणार आहे.गेल्या अडीच वर्षांपूर्वी महाआघाडी सरकारच्या काळात तमाम राज्याने हे पाहिले आहे.



## फिलगुड

**विठ्ठला वीट दाव**

खऱ्या भक्तांना विठ्ठला,
तू जरूर पाव ।
स्वार्थी पुढाऱ्यांना मात्र,
पायाखालची वीट दाव ।।

जाती-धर्माच्या झेंड्याखालील,
दंडुका कोणताय शोध ।
नाथाळांच्या माथी काठी हाणून,
दाखव विठ्ठला तू क्रोध ।।

किती दिवस दळायचे,
तेच ते जाती-धर्माचे पीठ ।
अशांना नक्कीच दाखव विठ्ठला,
तुझा पायाखालची वीट ।।

- विजय गायकवाड

# सहकार शिरोमणीचा हाबडा, कुणाचा होणार साफ सुपडा

**डी.एस.गायकवाड**

**निवडणूक जरी सहकार शिरोमणी वसंतराव काळे अर्थातच चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याची झाली असली तरी यामुळे पंढरपूर तालुक्यातील राजकारण ढवळून निघाले असून याचा परिणाम भविष्यातील निवडणुकांत दिसणार आहे. चंद्रभागेची निवडणूक झाल्यानंतर शब्दाचा शब्दप्रयोग केला आता हा हाबडा येणाऱ्या निवडणुकांत कुठे जिरणार की कुणाला तारणार,मारणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.**

पंढरपूर तालुक्याच्या राजकारणाची घुसळण अतिशय विचित्र आहे. इथे विरोधक सुद्धा काही निवडणुकांत एकत्रित येतात आणि एका दिलाने ताकदीने लढताना दिसतात.या तालुक्याने नेहमी नवनवीन नेतृत्वांना उभारी दिलेली दिसते. त्यामुळे इतर तालुक्यातील प्रस्थापितांसारखे राजकारण पंढरपूर तालुक्यात दिसत नाही. हे पंढरपुरी राजकारणाचे खूप मोठे आगळे वेगळे वैशिष्ट्य आहे. चंद्रभागा निवडणुकीच्या निमित्ताने देखील हे पहावयास मिळाले आहे.

मुळात पांडुरंग परिवाराविरोधात विठ्ठल परिवार असे राजकीय चित्र इथे पहावयास मिळते.पण या निवडणुकीत या परिवाराची दिलजमाई झाल्याचे चित्र पहावयास मिळाले.आणि दुसरीकडे अभिजीत पाटील यांनी एकाकी झुंज दिल्याचेही निदर्शनास आले.चंद्रभागा कारखाना आपल्या ताब्यात ठेवण्यात काळे यांना यश मिळाले असले तरी त्यांची जी ताकद या निमित्ताने निर्माण झाली आहे किंवा विठ्ठल परिवाराला जी उभारी मिळाली आहे त्या ताकदीचा फायदा ते कितपत करून घेतात यावरही विठ्ठल चे भविष्य अवलंबून असणार आहे.

चंद्रभागा निवडणुकीत विठ्ठल आणि पांडुरंग परिवार अदृश्य स्वरूपात का असेना एकत्रित झालेला दिसला तर दुसरीकडे अभिजीत पाटील यांनी या निवडणुकीच्या माध्यमातून हे सर्व नेते एकत्रित आले तरी आपण कुठपर्यंत आहोत याची चाचणी केलेली दिसते आणि भविष्यात आपणाला किती काम करावे लागेल याची शहनिशा ते करताना दिसत आहेत. त्यामुळे ते चंद्रभागेत हरले असले तरी त्यांनी या निमित्ताने विधानसभेची चाचणी केली आहे, असे म्हणायला हरकत नाही.

त्यामुळे निवडणूक चंद्रभागेची झाली असली तरी राजकीय वातावरण ढवळून निघाल्याने चंद्रभागेतील मताचा हाबडा कोणाच्या पथ्यावर पडणार आणि कोणाला मारणार हे पाहणे गरजेचे ठरणार आहे.



### विधानसभेची चाचपणी..

- काही निवडणुका भविष्यातील राजकीय आडाखे बांधण्यासाठी लढाव्या लागतात. याच दृष्टीने अभिजीत पाटील यांनी चंद्रभागेची निवडणूक लढवली आणि आपल्या स्वतंत्र ताकदीचा अंदाज घेतला.कुठे आपण कमी पडलो त्या ठिकाणी ते जोर लावतील आणि विधानसभेच्या मैदानात परिपूर्ण ताकदीने उतरतील असाच अंदाज आहे.

### बीआरएसला विठ्ठल पावणार का?

- तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांची नुकतीच भगीरथ भालके यांनी भेट घेतली आणि त्यातच झालेली चंद्रभागेची निवडणूक विठ्ठल परिवाराला बळ देऊन गेलेली आहे त्यामुळे भगीरथ भालके हे जर बीआरएसमध्ये गेले तर सर्व सहकाऱ्यांची त्यांना ताकद मिळेल आणि बीआरएसचे ते तगडे उमेदवार ठरतील.

### सोसावा लागणार फटका...

-आमदार बबनदादा शिंदे यांनी चंद्रभागा निवडणुकीत कल्याणराव काळे यांना मदत केल्याने अभिजीत पाटील त्यांच्यावर तासून दिसत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी अंतर्गत सामना रंगू शकतो. अभिजीत पाटील यांचे ४२ गावातील कार्यकर्ते आमदार बबनदादा शिंदे यांना पक्ष म्हणून मदत करतील की नाही? याबाबत सांशकता आहे. त्यामुळे हक्काच्या मताचा तोटा आमदार शिंदे यांना सोसावा लागणार आहे.

### आ.प्रशांत परिचारक फायद्यात...

- चंद्रभागेच्या निवडणुकीने आमदार प्रशांत परिचारक हे मात्र फायद्यात दिसत आहेत. विठ्ठल परिवार आणि पांडुरंग परिवारामध्ये टोकाच्या लढाया होत असताना हे दोन परिवार एकतेच्या दिशेने वाटचाल करू लागले आहेत. राष्ट्रवादीची उमेदवारी अभिजीत पाटील यांना मिळाली तर किमान विठ्ठलचे कट्टर समर्थक अभिजित पाटील यांना मतदान करणार नाहीत, असा पांडुरंग परिवाराच्या मनात आशावाद निर्माण झालेला दिसत आहे. त्यामुळे मालक सध्यातरी फायद्यात आहेत.